# विकासचक्र

## आध्यात्मिक व्यवस्थापनाचे तत्वज्ञान



साहेबराव शामराव जवंजाळ

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# विकासचक्र

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# विकासचक्र

## आध्यात्मिक व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान

लेखक

साहेबराव शा. जवंजाळ

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

# विकासचक्र - आध्यात्मिक व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान


## लेखक... साहेबराव शा. जवंजाळ

साकार अपार्टमेंट,१४५ अंबाझिरी हिलटॉप नागपूर ४४००३३

फोन नं .०७१२ २२२६०३४/ मोबाईल ९३२५५०५०३७



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



## ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : २८ मार्च २०२१**



©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

****लेखक परिचय****



साहेबराव शामराव जवंजाळ

जन्मतारीख : २६ ऑक्टोबर १९४५ ; काटोल जि.नागपूर

हल्ली मुक्काम व पत्ता - साकार अपार्टमेंट,१४५ अंबाझिरी हिलटॉप नागपूर ४४००३३

फोन नं .०७१२ २२२६०३४/ मोबाईल ९३२५५०५०३७

शिक्षण :

एस.एस.सी पर्यंत बी.आर.हायस्कुल काटोल

बी.एस.सी. (मोहता कॉलेज व हिस्लॉप कॉलेज नागपूर)

बी.एस.सी.टेक(लक्ष्मीनारायण इंस्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी नागपूर)

व्यवसाय : निवृत्त उपनिर्देशक,खादी ग्रामोद्योग कमिशन (भारत सरकार)

महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांची कर्मभूमि असलेल्या वर्धा येथील खादी ग्रामोद्योग कमिशन अंतर्गत ग्रामोद्योग अनुसंधान संस्था (महात्मा गांधींनी स्थापन केलेली ) येथे २५ वर्षे वास्तव्य.

**साहित्य :**

१.नागपूर पत्रिका (नागपूर टाईम्स ग्रुप) नागपूर या वर्तमानपत्रातुन १९८० ते १९९१ या काळात समाजव्यवस्था(८ लेख),मानवविकास व अध्यात्म (६लेख),कृषी व उद्योगाचे व्यवस्थापन(६ लेख), संत्रा प्रक्रिया उद्योग(६ लेख), कृषी(३लेख), कृषीउद्योग(६लेख)

या विषयावरील एकुण ३५ लेख प्रसिद्ध झाले.

२.जागृति (ग्रामिण औद्योगिकीकरण यावरील खादी ग्रामोद्योगाची मासिक पत्रिका) यातुन लेख प्रसिद्ध.

३.भगवदगीतेची विशेष आवड.संपुर्ण भगवदगीता मुखोद्गत .

*"भगवदगीतेतील मुख्य विषयावर दृष्टिक्षेप " ही लेखमाला विविध आध्यात्मिक ग्रुपवर (WA) पोस्ट होते.

*अखिल भारतिय गायत्री परिवार नागपूर येथे "विज्ञान व अध्यात्म" या अंतर्गत भगवदगीता विषयावर भाषण

४.भगवदगीता-"परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान" हे पुस्तक प्रकाशित झाले.

ई - पुस्तके

१ भगवद्गीता -परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान(ई-पुस्तक)

२.आध्यात्मिक क्रान्ति-परिवर्तनाचे व्यवस्थापन(ई-पुस्तक)

३.जीवनविकास : जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन (ई-पुस्तक)

*नागपूर पत्रिका (नागपूर टाईम्स ग्रुप नागपूर ) वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेले लेख :(१९८० ते १९९१)

*समाजव्यवस्था

१.तर भारत विकसित राष्ट्र होईल.

२.मानवशक्ती आणि शाश्वत समाजव्यवस्था

३.समृद्धि व रोजगार

४.भारताची गरिबी आणि आहार

५.समृद्ध राष्ट्रासाठी ग्रामसमृद्धि आवश्यक

६.ग्रामिण विकास आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह

७.ग्रामिण क्षेत्र आणि व्यावसायिक अभ्यासक्रम

८.प्रत्येक खेडे शहर झालेच पाहिजे

*मानवविकास व अध्यात्म

१.मानवी विकासाचा आधार

२.स्वअस्तित्व जाणले तरच विकास

३.स्वतःचे ज्ञान हेच अध्यात्म

४.सत्याची अनुभुति हाच विकास

५.हातुन मोठी कामे केंव्हा होतात

६.अहंकाराची नव्हे निर्णयसामर्थ्याची गरज

*कृषी व उद्योगाचे व्यवस्थापन

१.समतोल विकासासाठी विकेंद्रिकरण

२.यशस्वी विकेंद्रिकरणासाठी एक्स्चेंज पद्धति

३.ग्रामिण उद्योगाचे व्यवसाय संघटन

४.कृषी उद्योगाची संघटनात्मक रचना

५.सहकार चळवळीचा मार्ग

६.विदर्भातील सहकारी चळवळ-कांही उपाय

*संत्रा प्रक्रिया उद्योग

१.संत्रा प्रक्रिया उद्योगाचे जाळे

२.संत्रा उद्योग संयंत्रणा

३.संत्रा उत्पादक ते ग्राहक संयंत्रणा

४.आदर्श संत्रा उद्योग

५.संत्रा प्रक्रिया उद्योगात प्रथम पाऊल

६.संत्र्याची औद्योगिक उत्पादने

*कृषी

१.शेतीचे प्रश्न आणि सोडवणुक

२.पिकलं नसेल तर लुट नाहीतर लयलुट

३.ग्रामोद्योग विकास साधला तरच शेती जगेल

*कृषीउद्योग

१.विदर्भात प्रक्रिया उद्योग शक्य

२.भारताचा अनमोल नैसर्गिक ठेवा-कडुनिंब

३.सरकी प्रक्रिया उद्योग

४.सुगंधी द्रव्य उद्योग

५.विकेंद्रित फळे व भाज्या प्रक्रिया उद्योग

६.साबण उद्योग

# मनोगत-आभार

मानवी जीवनाच्या तत्त्वज्ञानाचे मुळ भगवदगीता ज्ञान आहे.समाजात,मनुष्यजीवनात प्रश्न निर्माण होतात.वर्तमानातील प्रश्न सोडविण्यासाठी भगवदगीता निश्चित दिशा देत आहे. याचा परामर्श "आध्यात्मिक क्रान्ति"(-परिवर्तनाचे व्यवस्थापन ) व "जीवनविकास-जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन" व ‘‘विकासचक्र’’ या तीन पुस्तकातुन घेतलेला आहे.

नागपुर जिल्ह्यातील काटोल हे माझे जन्मगांव. काटोलपासुन ५ कि.मि.वर असलेले फेटरी हे आमच्या कुटुंबाची वडिलोपार्जित शेती असलेले खेडे.या खेड्यात दरवर्षाला कार्तिक महिन्यात दिंडी,काकडआरती,दहीलाही इ. धार्मिक कार्यक्रम आमच्या वाड्यातुनच होत होते व गांवात कार्तिक महिन्यात पंढरीच अवतरत होती.हा अध्यात्माचा वारसा मला आमच्या कुटुंबाकडुन लाभला.तसेच माझे बंधुतुल्य मित्र डॉ.रमेश सालकर यांचे वडील (स्व.) डॉ.गोविंदराव सालकर यांची संपुर्ण भगवदगीता मुखोद्गत होती.हीच गोष्ट माझ्यासाठी प्रेरणादायी ठरली ज्यामुळे मी भगवदगीतेकडे आकर्षित झालो.त्यांचा मी ऋणी आहो.

वर्तमानातील प्रश्नाचे आकलन व्हावे व प्रश्नाची सोडवणुक करता यावी यासाठी ज्यांनी ज्ञान संपादन केले (४ पदवी,४पदव्युत्तर डिप्लोमा व १३ विषयात पदव्युत्तर पदव्या) असे उच्चविद्याविभुषित पंडीत माझे बंधुतुल्य मित्र श्री दिगांबर उपाख्य पंडीतराव म.आळशी यांचेशी या विषयावर सतत चर्चा होते.त्यांचा मी आभारी आहे.

या पुस्तकांचे संपादन करण्यासाठी डॉ.सौ.संगिताताई अरुण खुरद यांचे मोलाचे सहकार्य लाभले.त्यांचा मी आभारी आहे.

युवापिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणाऱ्या पुस्तकांचे महत्व जाणुन श्री.सुनील सामंत प्रकाशित करीत आहे, त्यांचा मी आभारी आहे.

सर्वात शेवटी माझे कुटुंबिय माझी पत्नि सौ.पद्मा साहेबराव जवंजाळ,माझ्या मुली डॉ.सौ.वैशाली मनोज पेठे,डॉ.सौ.अनुराधा प्रशांत अलोणे, डॉ.सौ.अनुपमा अनुप जुनघरे यांचे मला सतत सहकार्य लाभले.त्यांचा मी आभारी आहे.

**साहेबराव शा.जवंजाळ** **नागपुर**

# अर्पणपत्रिका






**शिवभक्तपरायण (स्व.) श्री.जानराव यादवराव जवंजाळ (माझे काका) व (स्व.) शांताबाई जानराव जवंजाळ (माझी काकु)**

**यांच्या पुण्यस्मृतिस समर्पित**

**प्रस्तावना**

**( विकासचक्र - पुस्तकाचा परिचय)**

मानवी जीवनाच्या तत्त्वज्ञानाचे मुळ भगवदगीता ज्ञान आहे.समाजात,मनुष्यजीवनात प्रश्न निर्माण होतात.काळ बदलत असतो.समाजात नवनवीन प्रश्न निर्माण होतात.वर्तमानातील विकासाच्या संकल्पना यानुसार ठरत असतात.भौतिक संदर्भात विकासाच्या संकल्पना बदलत असल्या तरी आध्यात्मिक संदर्भात मनुष्यजीवनाची विकाससंकल्पना कायम असते.ही न बदलणारी मानवी जन्मासाठी आवश्यक असलेली संकल्पना कोणती?याचाच आढावा "विकासचक्र" या पुस्तकातुन घेतलेला आहे.

*भगवदगीता धर्माचा विषय कि ज्ञानाचा?

ज्ञान मनुष्याचे कर्तृत्व फुलवीत असते.हे सत्य असले तरी मनुष्याचे अज्ञानच त्याच्या कर्तृत्वात खीळ टाकत असते. कारण स्वतःच्या याच अज्ञानाची मनुष्याला ओळख नसते. अज्ञानी अवस्थेतही स्वतःच्या निष्क्रियतेचे समर्थन स्वतःला योग्य सिद्ध करण्यासाठी मनुष्य करीत असतो. याचसाठी अर्जुन भगवदगीतेत धर्मज्ञान वापरतो.या पार्श्वभुमिवर भगवदगीता धर्माचा विषय आहे कि ज्ञानाचा?असा प्रश्न उपस्थित होतो.

भगवदगीतेनुसार याचेच उत्तर निश्चितच "ज्ञानाचा विषय" हेच आहे. कारण जगात ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे हा भगवदगीतेचाच संदेश आहे.

*विकासचक्र-विश्वसंचलन व आत्मोन्नति:

(आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च)

विश्वसंचलन व यांत मनुष्याची भूमिका या संदर्भात विश्वसंचलनाशी सहकार्य करणारे ज्ञान म्हणजे "विकासचक्र" प्रवर्तन हा ज्ञानाचा विषय ठरतो. याद्वारे मनुष्य विकासमार्गावर असतो.

मनुष्यजीवन अनित्य आहे.पण विश्वचक्र अव्याहत सुरु असते.मनुष्य समजतो, मी भोगैश्वर्य सुखासाठी कर्म करीत आहो!याच विचारामुळे अर्जुन म्हणतो,मला कांही नको. मग या शोकदायी,कष्टदायी कर्माचे "प्रयोजन" दिसत नाही.हाच विचारबदल होण्यासाठी भगवदगीतेची

आध्यात्मिक क्रान्ति आहे.अर्थात व्यवहारातील नियतकर्म हे निमित्त आहे.याच कर्माद्वारे विश्वचक्रप्रवर्तनात योगदान  होत असते.याच पार्श्वभुमिवर विश्वसंचालनाचे ज्ञानविज्ञान व विश्वसंचालकाशी मनुष्याचे नाते हा भगवदगीतेतील अध्यात्मज्ञानाचा विषय आहे.

मनुष्यजीवन नित्य विकासमार्गावर असावे हा भगवदगीतेचा संदेश आहे.या  विकासमार्गात मानवी कर्तृत्व साकार होण्यासाठीच अध्यात्मज्ञान सहकार्य करते हे सत्य जगात केवळ भगवदगीता सांगत आहे.

या भूतलावर मनुष्यच प्रत्यक्ष कार्य करु शकतो. ईश्वरालाही विश्वकल्याणाचे कार्य करण्यासाठी मनुष्यजन्मच घ्यावा लागतो. ईश्वराचा अंश हृदयात धारण करुनच मनुष्यजन्म या भूतलावर अवतरलेला आहे. विश्वसंचालकाला अर्थात ईश्वराला जे करायचे असते ते (दैवीगुणसम्पत्तियुक्त-) मनुष्याच्या माध्यमातुनच केल्या जाते.हेच ज्ञान भगवदगीतेतुन स्पष्ट होते.

कुरुक्षेत्रावर अर्जुनाबरोबर असतांना श्रीकृष्णाला स्वतः लढाई लढायची नव्हती.तर जे दिव्यकार्य करायचे होते,ते अर्जुनाच्या माध्यमातुन कसे घडुन येणार होते याचेच ज्ञान व प्रात्यक्षिक भगवदगीतेतुन दिलेले आहे.

अर्थात मनुष्यजन्म सिमित काळासाठी आलेला असला तरी विश्वकल्याणाचे महान कर्म करण्याची संधी केवळ मनुष्याला लाभलेली आहे. विश्वसंचलन व मनुष्याची जीवनयात्रा यांचा समन्वय विकासचक्रप्रवर्तन साधत असते. विकासचक्र "आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च" या तत्त्वाचे सार्थ प्रतिक ठरते.हे विकासचक्रच आध्यात्मिक व्यवस्थापनाचा आधार  ठरते.

*डार्विन  vs.भगवदगीता
(Survival vs.विकासचक्र)

डार्विनच्या सिद्धान्तातुन "Survival of the fittest " हा मनुष्यजीवनासाठी संदेश जगात पसरला.याचाच अर्थ Survival (योगक्षेम ) हाच जीवनाचा अर्थ व हेतु ठरतो. भगवदगीता मात्र जीवनयात्रा नित्य विकासमार्गावर असावी हा संदेश  देत आहे.

जगातील अडचणीवर मात करण्यासाठी अनेक शोध लागले व मानवी जीवन सुसह्य झाले. कार्यकौशल्य साधुनच मानवकल्याणासाठी  कार्याचे योगदान होत असते.भगवदगीतेत "योगः कर्मसु कौशलम्" अशी कार्यकौशल्याची भूमिका स्पष्ट केली आहे.

प्राचीन समाजव्यवस्थेत  नवपिढी पारंपरिक कार्य करीत असे.याच अनुषंगाने शिक्षण दिल्या जायचे.आधुनिक विश्वात शिक्षणप्रसार झाला पण "बेरोजगारी"(शिक्षित होवुनही निष्क्रिय!) या शब्दाने जन्म घेतला.म्हणुनच वर्तमानातील शिक्षणाचा उद्देश मनुष्याला कार्यरत होण्यासाठी असावा असा सुर शिक्षणक्षेत्रात दिसुन येतो.भगवदगीता याच संदर्भात(मनुष्याला कार्यरत होण्यासाठी) विश्वाला जागृत करीत आहे.कार्यरत होणे म्हणजे कष्ट करणे नव्हे तर कार्याद्वारे भौतिक , आध्यात्मिक(अर्थात मानसिक) विकास साधणे.यालाच कार्यकौशल्य (योगः कर्मसु कौशलम्) म्हटले आहे.याच कार्यकौशल्याची संकल्पना विकासचक्राद्वारे स्पष्ट होते.

*विकासचक्र(ज्ञान,कर्म व भक्ति)

१.ज्ञान(ज्ञानाची दृष्टि,विकासाची दृष्टि,सुखाची दृष्टि) २.विकास (विकासाचा विचार व कृति)

३.सुख (सुखाचा विचार व साधना)

याप्रमाणे ७ विभागात विस्तारले आहे.हेच विकासचक्र मनुष्याच्या विकासमार्गाचे व्यवस्थापन होण्यासाठी आधार ठरते.अर्थात आध्यात्मिक व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान ठरते.

**साहेबराव शा.जवंजाळ**

**नागपुर**

# विकासचक्र

## (आध्यात्मिक व्यवस्थापनाचे तत्वज्ञान)

साहेबराव शामराव जवंजाळ

अनुक्रमाणिका


| अ.नं | विषय | पेज नं |
| --- | --- | --- |
| १. | विकासचक्राचे ज्ञानविज्ञान | |
| २. | विकासचक्र | |
| ३. | जीवनाचे आध्यात्मिक व्यवस्थापन | |

# १

# विकासचक्राचे ज्ञानविज्ञान

**१.१) ज्ञान– कर्म –भक्ती (अमृतंगमय–जीवनप्रवासातील ज्ञान )**

**१.२)विकासचक्र प्रवर्तन अर्थात अमृतंगमय** जीवन प्रवास (**Spiritual journey** ) :

**१.३) विकासचक्रातील ज्ञान,कर्म व भक्ती याची ज्ञान, विकास व सुख यात विभागणी:**

## विकासचक्र प्रवर्तन :

### आत्मनो मोक्षार्थ जगतहितायच चा संदेश व आध्यात्मिक व्यवस्थापनाचा आधार

The goal of life is to make your heartbeat match the beat of the universe, to match your nature with NATURE.-Joseph Campbell

व्यक्ती योगक्षेमासाठीं कार्य करतो .याच कार्याचा समुहविकास,समाजविकास व सृष्टीचे संचलनचक्र यांचशीं संबंध व्यक्तीच्या जीवनाचे संचलनचक्र सृष्टीच्या संचलनचक्राला ( प्रवर्तनचक्र)सहकार्य करते,ते विकासचक्र ठरते. हाच **आत्मनो मोक्षार्थ जगतहितायच'**याचा यथार्थ संदेश ठरतो.

**एवं प्रवर्तीत चक्रं न अनुवर्तयतीह यः , '**

. **अघायु इंद्रियरामः मोघं पार्थ स जीवति.**

अर्थात जो सृष्टीसंचलनचक्राला (Wheel of GOD Devotion ) सहकार्य करीत नाही ते जीवन निरर्थक आहे. (गीता ३–१६) यातून सृष्टी व व्यक्तीचे संचलनचक्र याचे नाते स्पष्ट होते. ज्ञान बुध्दीवर संस्कार करते.बुध्दीवरील जगण्याचे निश्चीत संस्कार प्रकृती सक्षम करते व शरीररूपी यंत्र योग्य दिशेने संचालीत करते .या विकासचक्रात योगसाधना(Charging)होत असते. शरीरयंत्र जीवनविकासाचे वाहन आहे..जीवनविकासाची ज्ञानी व अज्ञानी अशी व्दिविभागणी होण्यासाठी गीतेत मानवी शरीराला वाहनयंत्र उपमा दिलेली आहे.या वाहनयंत्राला नाव म्हटले तर पाण्यात नाव वाहणे व नाव वल्हवणे यात भेद असतो.नाव वल्हवणारा प्रवास करीत असतो. '

**ईश्वरः सर्वभूतानां ह्रदेशे अर्जुन तिष्ठती .**

**भ्रामयन सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया**

अर्थात ईश्वरच सर्वांच्या ह्रदयस्थानी राहून त्याचे संचलन करीत असते.(गीता ३-६१) . व्यक्ती,समाज,सृष्टी यांचे संचलनचक्र (Live Cycle)अव्याहत यंत्रवत सुरुअसते.संचलनचक्र,विकास चक्र व आध्यात्मिक क्रांती यातून अनुक्रमे स्थिती(nature),विकास(developement) व परिवर्तन(revolution) याचा बोध होतो.जीवनाचे संचलनचक्र प्रकृतिला कार्यरत ठेवते.जेंव्हा व्यक्तीचे संचलनचक्र सृष्टीचे संचलनचक्राला सहकार्य करते,तेंव्हा व्यक्तीचे संचलनचक्र विकासचक्र ठरते. याच आधारावर सृष्टीचे संचलनचक्र आध्यात्मिक क्रांतीचा संदेश देते.

एकच संदेश जीवनात बदल घडवून आणतो हाच आधार आध्यात्मिक क्रांतीसाठी वापरला तर व्यक्ती,समाज व सृष्टी यातील संचलन व विकास चक्र यातील भेद जाणणे व जीवनाचे विकास चक्र प्रवर्तीत करणे हेच आध्यात्मिक क्रांतीचे प्रयोजन ठरते.

## १.१) ज्ञान- कर्म -भक्ती (अमृतंगमय-जीवनप्रवासातील ज्ञान )

मनुष्य जीवनात त्याच्या प्रगतीसाठी त्याची प्रत्यक्ष जीवनयात्राच महत्त्वाची असते. म्हणून जीवनयात्रेसाठी आपली भूमिका सक्षम करणे हेच मनुष्याचे ध्येय असले पाहीजे.सृष्टीच्या अनंत काळात मनुष्याचे जीवन विशिष्ट काळासाठी दृश्य असते.जीवनाचा प्रवास सुरू असतो. या प्रवासात सुख-दुःख अनुभवतो. जगातील प्रत्येक व्यक्ती आपल्या ज्ञानानूसार,सुखासाठी कार्यरत असतो.सुखासाठी भोगैश्वर्याचे सुख ( Wants) कार्यरत करते तर कार्याव्दारे भक्ती हे सूखाचे रहस्य ठरते.ज्ञानात ज्ञान व विज्ञान याचा समावेश होतो.याप्रमाणे जीवनविकासात ज्ञान(ज्ञानविज्ञान),कर्म(विकास),व सुख(कार्याव्दारे भक्ती ) याचा समावेश असतो.व जीवनविकासात ज्ञान,कर्म व भक्ती हे परस्परपूरक ठरतात.शाश्वत अमृतधर्म ज्ञान, कर्म व भक्ती याच संबंधात पारदर्शकता आणते

### अ.) ज्ञान:

**ज्ञानी दृष्टी** (**VISION**) : जीवनात जसे ज्ञान असते तसे दिसत असते.Your eyes cannot see if your mind does not know अंधारात डोळे असूनही वस्तू दिसत नाही,सूर्यप्रकाश आला की दृष्टी येते व वस्तू दिसते.जसा सूर्य सृष्टीला प्रकाशीत करतो,तसाच जीवनात ज्ञानाचा उपयोग प्रकाशासमान आहे याचा बोध होतो.यामुळे ज्ञानाचाच अर्थ कळतो. हीच ज्ञानी दृष्टी ठरते

वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यासाठी ज्ञानी दृष्टीची गरज असते. संपूर्ण मानवी समाज बुद्धीचाच चमत्कार आहे. मानवी समाजातील प्रगती किंवा शोध बुद्धीचेच अपत्य असते. मनुष्याला प्राप्त असलेली बुद्धी

ज्ञानशक्ती आहे. तसेच धारणाशक्ती आहे. कोणतीही घटना दोन वेळा घडते. प्रथम ती डोक्यात घडते व नंतर प्रत्यक्षात कार्याद्वारे घडत असते. ईश्वरज्ञानाचा आश्रय करण्यासाठी याच सत्याचा उपयोग भगवद्‌गीतेच्या विश्वरूप दर्शन योगात श्रीकृष्णाने स्पष्ट केला.

मनुष्य जीवनातील चिंता, भय, क्रोध, दुःख या नकारात्मक भावना असतात. जीवनाच्या प्राकृतिक (सामान्य) पातळीवर या नकारात्मक भावना प्राकृतिक सुखाच्या बंधनामुळे निर्माण होतात. या नकारात्मक भावनेमुळे संशयाला वाव मिळतो. धारणाशक्ती दुबळी होते.प्राप्ती (ऐश्वर्य)साठी कार्य मनुष्य जीवनातील सामान्य पातळी असते.याच पातळीवर किर्ती,स्वर्गप्राप्ती या अर्थाने सुसंस्कृत व्यक्ती कार्याकडे पाहतो.अर्जुनाला याच दृष्टीतून प्रश्न पडला होता. केवळ सुखाने जगणे याचसाठी राज्य हवे ही लोभी प्रवृत्ती आहे. लोभामुळे अधर्माचरण मला करायचे नाही असे भाष्य करतो.त्याची वैचारिक दिशा (दृष्टी) प्राकृतिक पातळीवर होती..मनुष्य जीवनातील ज्ञानी भूमिकेचे महत्व जाणले तर आध्यात्मिक क्रांतीची उपयुक्तता स्पष्ट होते. म्हणूनच ज्ञानी पातळीची वैचारिक दिशाच(दृष्टी) श्रीकृष्णाने सांगितली.

जे महान कार्य करतात त्यांना त्या कार्याची प्रथम दृष्टी लाभते यालाच स्वप्न पाहणे (**VISION**)म्हणतात. ती दृष्टी प्रत्यक्षात साकार होते ते साहसामुळे, धारणाशक्तीमुळेच. म्हणून ईश्वरज्ञानाव्दारे मुक्तीची संकल्पना म्हणजेच ईश्वरज्ञानाचा आश्रय करून ज्ञानी होण्याची प्रक्रिया असते. म्हणून बुद्धीमध्ये सकारात्मक भावना प्रवाहीत होण्यासाठी (प्रसन्नता,स्थीरत्व) जीवनाला ज्ञानी होण्याच्या प्रक्रियेत आणणे हीच आध्यात्मिक क्रांती आहे.जीवनप्रवासाला **तमसो मा ज्योतिर्गमय** ही दृष्टी लाभते.

**जगण्याची ज्ञानी भूमिका (उच्च पातळी )** :

कार्याद्वारे जीवनविकास हाच भगवतगीतेचा विषय आहे.स्वतःला कार्यरत करण्यासाठी धर्मगति (नियत कार्य),कर्मगति (जीवनविकासात कार्याचे महत्व **),**ईश्वरगति (ईश्वराने नियोजिलेले कार्य,नियति ) जाणणे हाच भगवतगीतेतील ज्ञानाचा विषय आहे. ज्यांच्यात चांगल्या कार्याची प्रेरणा आहे,चांगले (दैवी) आहेत,त्यांना दुर्बलता शोभत नाही. केवळ जीवन जगणे हेच मनुष्य जीवनाचे उद्दिष्ट नाही तर त्याचे अव्यक्त स्वरूप त्याच्या जगण्यातून तो साकार करीत असतो.ही जीवनाची उच्च पातळी ठरते.अर्थात त्यांचे जीवन केवळ जगण्यासाठी जगणे अशा प्राकृतिक पातळीवरील नसून हा जन्म विशेष कार्यासाठी झाला आहे. जणू ईश्वरानेच त्याची विशेष कार्यासाठी नियुक्ती केली आहे.अशी ज्ञानीपातळीवरील वैचारिक दिशा असते.

ईश्वर व स्वतःची ओळख झाली तर स्वतःचे अव्यक्त स्वरुप साकार करण्यासाठी ज्ञानी होतो. सागरातील थोडे पाणी वेगळे केले तर सागरातील पाणी व सागर याचे नाते प्रतिनिधीत्व स्पष्ठ करते.वेगळे पाणी सागर नसते. सागरातील पाण्याला सागरात मिसळण्याची संधी नसते तर ईश्वररूपी सागरात मिसळणे

हेच ईश्वराचा प्रतिनिधी या नात्याने मनुष्य त्याचे ध्येय बनवतो. यातूनच त्याची स्वतःची ओळख बनत असते.अशाच व्यक्तीमुळे समूह, देश याची ओळख बनत असते.

जे प्रत्यक्षात घडत असते यांत व्यक्ती,समाज व सृष्टी यांचे संचलनचक्र प्रवर्तन दर्शविते.जेंव्हा व्यक्तीचे संचलनचक्र सृष्टीचे संचलनचक्राला(Wheel of GOD)सहकार्य करते, तेंव्हा व्यक्तीचे संचलनचक्र विकासचक्र ( Walk with GOD )ठरते.जीवनविकास मार्गात भोगैश्वर्याचे सुख रज सुख ठरते .कारण त्या सुखाचा अभाव दुःखाचे कारण ठरते.ही प्राकृतिक अवस्था असते. सत सुख कार्याव्दारे भक्ती असते.ज्ञानाची (विज्ञान व ईश्वरज्ञान) आवड निर्माण करते.जीवनप्रवासात ईश्वरज्ञानाला प्रकाश ( ज्ञान),सत(चांगले,कल्याणकारी कार्य),अमृत(शाश्वताची भक्ती) हे संदर्भ प्राप्त होतात.व्यक्तीची प्राकृतिक पातळी संचलनचक्र असते,तर ज्ञानी पातळी विकासचक्र ठरते.विचार बदल होण्यासाठी जीवनाला ईश्वरज्ञानाशी जोडणे आध्यात्मिक क्रांती ठरते.आध्यात्मिक क्रांतीमुळे विकासचक्र प्रवर्तीत होते.याप्रमाणे शाश्वत अमृत धर्म जीवनाचे विकासचक्र प्रवर्तीत करते.सृष्टीचे प्रवर्तनचक्र(Wheel of GOD ) कळले तर जीवनाचे विकासचक्रप्रवर्तन कळते.सृष्टीचे प्रवर्तनचक्रात सृष्टीचे संचलनचक्र,समूह विकासचक्र,जीवन विकासचक्र याचा समावेश होतो.या ज्ञानामुळे वर्तमान कळतो.

**ब) कर्म : (प्रकृतीधर्मा**तील विज्ञान)

**वर्णाश्रमाची पार्श्वभुमि:** जगातील प्रत्येक व्यक्ती प्रकृतीधर्मानुसारच (स्वभावनियत) कार्यरत असतो. :प्रकृतीधर्मावर आधारीत मानवी संसाधनाचे वर्गीकरण तत्कालीन भारतात वर्णाश्रम व्यवस्थेत आढळते. यामुळे समाजधर्म (social system) या अर्थाने वर्णाश्रम भारतातील मानव संसाधन आधारीत तत्कालीन समाजव्यवस्था ठरते. महाभारत युध्दात अर्जुन स्वतःच्या निष्क्रीयतेचा युक्तीवाद करतांना वर्णाश्रम/जातीधर्म हाच शाश्वत धर्म आहे व युद्धामुळे वर्णसंकर होईल व आम्ही पापाचे धनी होऊ असे भाष्य करतो. तत्कालीन वर्णाश्रम व्यावसायिक, कार्यान्वित योजना करणारी भारतातील पारंपरिक व्यवस्था होती. त्यानुसार सहजकार्य अर्जुनाचा स्वधर्म म्हटले आहे. यावरून वर्णाश्रम यावरच भगवद्गीतेत श्रीकृष्णाने धर्माचे शिक्कामोर्तब केले असा निष्कर्ष काढणे म्हणजे अर्जुनाचा युक्तीवाद योग्य होता व कौरवाची बाजू धर्माची होती असाही युक्तीवाद होऊ शकतो. या युक्तीवादाला म्हणूनच प्रज्ञावाद ठरविले. व ज्ञानी भुमिका धारण करण्यासाठी प्रकृती धर्माचे रहस्य/ज्ञान स्पष्ट केले.

**प्रकृतीधर्म :** प्रकृतिधर्माचे विज्ञान जाणून विकासासाठी कार्याचे नियमन करावे लागते. प्रकृतिधर्माचा आधार गुण (जीवनमूल्ये) व सहजकार्य (state of art) असते. गुणानुसार कार्याकडे पाहण्याची दृष्टी बनते. हे प्रकृतिधर्म चार विभागात जगातच आढळतात. जगतहिताय कार्य अर्थात मानव कल्याणाचे कार्य करण्यासाठी ज्ञानविज्ञानयुक्त असणे हा ब्रह्मविभाग, समूहहिताय कार्याला समर्थ होण्यासाठी शौर्य, तेज, वचननिष्ठ योजना (Commitment) विशिष्ट गुणाने युक्त असते. हा क्षात्र विभाग, संपत्ती निर्मितीसाठी

(वित्त) उत्पादन, व्यवसाय निपुणता असणे हा वैश्य विभाग असतो. हे तिन्ही विभाग रोजगार निर्मिती करीत असतात. म्हणून रोजगार (कार्य) निर्माते (Job creator) ठरतात. तीन्ही विभागाच्या कार्याला पूरक असणारे सेवाकार्य (Job seeker)विभाग ठरतो. याप्रमाणे जगात जगतहीत (मानवकल्याण) कार्य, समाजहीतकार्य, उत्पादनकार्य, सेवाकार्य संचालित असतात, त्यामागे प्रकृतिधर्म कारण असतो. ज्ञानी होण्यासाठी आपल्या स्वभावनियत कार्याद्वारा योगसाधना करण्यासाठी ईश्वरभक्तीचे रहस्य गीतेद्वारा स्पष्ट होते.

**स्वधर्म** : वर्तमानात मानव संसाधन निर्मितीचे कार्य शिक्षण, विद्यापीठ करीत असते. परिवर्तीत समाजव्यवस्थेत प्राप्त काळाचे आव्हान स्वीकारण्यासाठी स्वतःला सक्षम कार्यभूमिका देणे हे स्वतःचे दायित्व ठरते. म्हणून गुण (values) व सहजकार्य (state of art ) या द्वारा प्रकृतीधर्म विकसित करणे आवश्यक ठरते. या प्रकृती धर्मानुसारच मनुष्य कार्यरत असतो. म्हणून कार्यक्षम होण्यासाठी प्रकृतीधर्म विकसीत करणे व प्रत्यक्ष कार्यरत राहण्यासाठी स्वधर्म ठरविणे हेच शाश्वत धर्मातील स्वधर्म रहस्य आहे. समाजधर्म या अर्थाने वर्णाश्रमात कार्याच्या अधिकारावर निर्बंध होते, तर शाश्वत धर्म या अर्थाने प्रकृतीधर्माचे तत्व जगात सर्वमान्य होऊ शकते. कारण जगातील व्यक्ती स्वतःच्या प्रकृतीधर्मानुसारच कार्यरत असतो. याप्रमाणे शाश्वत धर्म व समाजधर्म यातील भेद लक्षात घेतला तरच प्रकृतीधर्माचे महत्त्व मनुष्याला ओळखणे शक्य होईल व वर्तमानात मनुष्याला स्वतःची कार्य प्रतिभा सक्षम करण्यासाठी उपयुक्त होईल. शाश्वतधर्माचा उपयोग करून ज्ञानी पातळी गाठणे यामुळे शक्य होईल जे मनुष्य जीवनाचे ध्येय आहे.

**असतो मा सत गमय– स्वधर्म कौशल्य** : मनुष्याला कुटुंबात कुलधर्म, समाजात व्यावसायिक धर्म, समाजधर्म, देशधर्म मिळतो. तो ज्या कुरूक्षेत्रावर आहे. त्याचा स्वधर्म देणे त्याचे दायित्व असते व त्या स्वधर्मावर अध्यात्मिक उन्नति व्हावी यासाठी धर्म असतो. ज्ञानी होण्यासाठीच प्रकृतीधर्माच्या कार्याला स्वधर्म करणे या अर्थाने अर्जुनाच्या कार्याला स्वधर्म संबोधले आहे.स्वधर्म हा स्वतःचे कर्तव्य दर्शक ठरतो. जे मनुष्याचें स्वतःचे दायित्व असते. स्वतःला स्वधर्म देण्याचा मनुष्यालाच अधिकार प्राप्त होतो. ज्याव्दारे तो स्वतःच्या स्वातंत्र्याची, मोक्षाची घोषणा करतो. पशूला तो अधिकार नसतो, कारण मनुष्यालाच याचे ज्ञान असते. पशूला नसते, हाच मनुष्य आणि प्राण्यांमधील महत्वाचा भेद आहे. स्वधर्म ठरविण्यासाठी कार्यातील सत् , योग्य वा चांगले कार्य या अर्थाने असतो व कार्य करतांना कार्यनिष्ठा होण्यासाठी सत् म्हणजे शाश्वताला समर्पण असा अर्थ असतो. खेळाच्या चमूधील खेळाडू खेळातील नियम पाळून स्वधर्म ठरवतात तर चमूला समर्पित होऊन खेळत असतात. खेळाडू बदलत असतात, तर चमू कायम म्हणुन शाश्वत (सत् ) ठरते. याप्रमाणे सत् असत्चा उपयोग स्वधर्मासाठी होतो. कार्याचा निश्चय पक्का करण्याचे स्वधर्म साधन असते.जे योग्य(सत् ) त्याचा निर्णय व शाश्वताला समर्पीत कार्य असा **असतो मा सतगमय** या मार्गावर हा जीवनप्रवास असतो.

**निर्णय अधिकार :** स्वातंत्र्य प्रत्येक प्राणीमात्राची नैसर्गिक प्रेरणा असते.पक्षाला उडाण करणे हे त्याचे स्वातंत्र्य (Born Free )मुलभूत प्रेरणा असते.कर्म करण्याचा अधिकार **कर्मण्येवाधिकारस्ते**– म्हणजे निर्णय अधिकार मनुष्याचे मुलभूत स्वातंत्र्य असते. जीवनाच्या प्राकृतिक अवस्थेत प्रकृतिवश असल्यामुळे कार्याचा व्यावहारिक जीवनमार्ग चालत असतो .जीवनमार्गात निर्णय व प्रकृतिधर्म –सहजकार्य (State of Art ) हे मुख्य घटक असतात. जीवनात कार्याचा मार्ग कच्चा होणे ही दुबळी भूमिका व मार्ग पक्का असणे ही सक्षम भूमिका आध्यात्मिक संदर्भात अज्ञानी व ज्ञानी भूमिका अशी विभागणी करते.हीच विभागणी प्रज्ञावादी व ज्ञानी भूमिका यातील भेद स्पष्ट करते.जीवनमार्गाला आत्मप्रकाशाने प्रकाशीत करून जीवनमार्ग **अमृतं**गमय करणे यार्ची निवड करण्याचा अधिकार मात्र मनुष्याचा असतो .आध्यात्मिक क्रांतीसाठी अध्यात्मज्ञानाचा आश्रय करणे हा स्वतःला अधिकार असतो.कार्यावर स्वधर्माचे व निर्णयावर कर्मयोगाचे शिक्कामोर्तब स्वतःचे असते.या अधिकाराचा वापर केला नसला तरी जीवनमार्गात कार्य घडतेच तर सक्षम होण्यासाठी जीवनमार्गातील कार्याद्वारे योगसाधना व्हावी म्हणून ईश्वरज्ञानाचा वापर करण्याची संधी प्रत्येक मनुष्याला गीतेने उपलब्ध करून दिली.

### क ) भक्तीरहस्य (कार्यातील आध्यात्मिक गती )

There is always the danger that we may just do the work for the sake of the work. This is where the respect and the love and the devotion come in-that we do it to GOD ,and that is why we try to do it as beautifully as possible -Mother Teresa

**कर्मातील उर्जा :** मनुष्याच्या जगण्यातून मानसिक शक्तीची (साहस,निर्भयता,स्थीरता) प्राप्ती होणे ही कर्मातील उर्जा ठरते.जीवनविकासासाठी कर्म कारण ठरते व ज्ञानी होण्यासाठी कर्मातील आध्यात्मिक गती कारण ठरते. **गहना कर्मणो गतिः** (गीता ४–१७) याद्वारे कर्मातील गूढ स्पष्ट होते.मोटरकार पेट्रोलवर चालत असते, तर ईश्वराने मनुष्याच्या शरीरातच अशी यंत्रणा बनविली आहे की त्याला चालविण्यासाठी उर्जा तोच निर्माण करीत असतो व जीवनप्रवासाला गती देत असतो. दुःख, चिंता, भय यामुळे जीवनप्रवासाची गती मंदावते. प्रत्यक्ष जीवनयात्रेतच अज्ञानाची ओळख होते. जीवनमार्गातील संशय अज्ञान असते.विश्वासासाठी ईश्वरज्ञान आहे. मनुष्याची धार्मिकता त्याची ईश्वरावर श्रध्दा व्यक्त करते. ईश्वरभक्तीव्दारे त्याला सुखाचे रहस्य कळते. विश्वासाचे सामर्थ्य कळते. श्रद्धेचे विश्वासात रुपांतर होऊन हाच विश्वास उर्जेचे कार्य करीत असतो.

**मृत्योर्मा अमृतंगमय** –अध्यात्मज्ञानामुळे ईश्वराची जगतचालक म्हणून ओळख होते. ईश्वरज्ञानात रमणे यामुळे बुद्धियोग मिळतो.आपल्या बुद्धीला, आचरणाला ईश्वराच्या दिव्यज्ञानाने आच्छादून टाकणे म्हणजे बुद्धीला युक्त करणे, संस्कारीत करणे,यामुळे आत्मठायी मन स्थीर होते व सत् – असत् या द्वंद्वापासून मुक्त होतो. हाच बुद्धीयोग .**(Connection with GOD)** असतो . जी दिव्यशक्ती संपूर्ण

ब्रह्मांडाला संचालित ठेवते तीच दिव्यशक्ती  मनुष्याच्या हृदयात विराजमान होते व त्याची अनुभूती होते, तेंव्हा आत्मा शरीररूपी वाहनात स्थानापन्न होऊन, वाहनाचा स्वामी जाणून जीवनाची नाव वल्हवीत असतो.शाश्वत धर्मातील **मृत्योर्मा अमृतंगमय** या मार्गावर हा जीवनप्रवास असतो. सुखासाठी कार्य करतो.याच कार्याद्वारे शाश्वत सुखाची साधना करणे.हा जीवनप्रवास घडतो.

**अनित्यं  असुखं  लोकं  इमं प्राप्य भजस्व माम् (गीता ९–३३)**

सुसंस्कृत मनुष्य स्वतःच्या विकासासाठी स्वतःला स्वधर्म देतो. निर्णय देतो त्याचे उत्तरदायीत्व स्वीकारतो ही संस्कृती असते. ईश्वरज्ञानाने युक्त होऊन हेच उत्तरदायित्व ईश्वराकडे हस्तांतरीत होते. ज्यामुळे नैश्कमसिद्धी येते. हाच महत्त्वाचा दृष्टीबदल होतो. ज्यामुळे सर्व संशय दुर होतात. धर्म अधर्माचा जरी संघर्ष असला तो मिटतो. व मार्ग नीतीचा असतो.  याप्रमाणे कार्याला ईश्वरज्ञानाचे साधन करण्याचे कौशल्य साध्य करणारा ज्ञानी ठरतो. पुढील गोष्टीवरून प्रत्यक्ष कृती व त्यातील आध्यात्मिक गती स्पष्ट होते.

*गोष्ट –(१)एक धर्मगुरू बसमधून प्रवास करीत असतात. प्रवासात बस नादूरूस्त झाल्यामुळे थांबते. वेळ घालविण्यासाठी प्रवासी नदी पार करून जवळच्या अरण्यात भ्रमन्ति करतात. तेथे तीन साधू एका पायावर साधना करतांना दिसतात. धर्मासाठी या अडाणी लोकांना किती कष्ट पडत आहे हे पाहून धर्मगुरूला दया येते व साधूना ईश्वराची कृपा प्राप्त करण्यासाठी प्रार्थना शिकवितात. बस दुरुस्त होताच मार्गाला लागतात. बस सुरू होणार तितक्यात धर्मगुरूला साधूचा आवाज ऐकायला येतो. तिन्ही साधू पाण्यावरून धावत येत असतात. तो चमत्कार पाहून धर्मगुरू स्तंभित होतात. साधू धर्मगुरूला म्हणतात, गुरुजी आपण शिकविलेली प्रार्थना आम्ही विसरलो. पुन्हा सांगा. तेंव्हा धर्मगुरूला आपले अज्ञान कळते व साधकांना क्षमा मागतात. मनुष्य बौध्दिक ज्ञान मिळवतो. पण प्रत्यक्ष कृतीशिवाय ज्ञानी ठरत नाही.*

*(२)एका गांवाबाहेर संन्याशाचा आश्रम होता. आश्रमात जातांना नदी ओलांडून जावे लागत असे. आश्रमात एक गौळण दूध आणीत असे. नदीला जर पाणी जास्त असले तर गौळण दूध आणायचे टाळेल म्हणून पाण्याचे   भय बाळगू नको असे संन्यासी महाराज गौळणीला सांगत असायचे. त्यांनी गौळणीला पाण्यापासून भयमुक्त करणारा मंत्र शिकविला. एक दिवस नदीला पूर आला. गौळणीला आश्रमात आलेले पाहून संन्यासी महाशय आश्चर्यचकीत झाले व त्याचे रहस्य विचारले. गौळण म्हणाली, महाराज आपणच तर मंत्र दिला, तो मंत्र उच्चारत मी नदी पार केली. हा चमत्कार पाहून आपल्यात महान शक्ती आहे असा संन्यासी विचार करू लागला. अडाणी गौळण जर या मंत्राद्वारे पुरातूनही चालू शकते तेव्हा आपण तर धावत जाऊ शकतो. गौळणीने आश्रम सोडल्यावर संन्यासी तडक नदीकडे धावत सुटले व धावतच पाण्यात पदार्पण केले. संन्यासी महाराज पाण्यात बुडायला लागले व पुराबरोबर वहात गेले. भोळ्या गौळणीने स्वतःच्या स्वधर्माला आध्यात्मिक गती दिली. तिने अडथळा पार केला .संन्याशाला मात्र पोकळ पांडित्याच्या अहंकाराने प्राणास मुकावे लागले. महान कार्य  करणारे निर्भय असतात..पुरातून चालणे किवा पाण्यावर*

*चालणे हा चमत्कार गौळणीसाठी दुय्यम असतो, तर स्वधर्माचरणाची कार्यनिष्ठा ज्ञानात रुपांतरीत होते. म्हणूनच शब्द पांडित्य जाणणाऱ्या संन्याशापेक्षा गौळण ज्ञानी ठरली. चमत्कारालाच ज्ञान समजणाऱ्या संन्याशाचे अज्ञान उघड झाले.*

*(३)एक संन्यासी झाडाखाली झोपलेला असतो. झाडावर एक कावळा असतो. त्याची विष्ठा संन्याशाच्या अंगावर पडते. तो उठून रागाने कावळ्याकडे पाहतो कावळा भस्म होतो.संन्याशाला सिध्दी प्राप्तीचा अहंकार होतो. तो गावात भिक्षा मागतो. एका घरासमोर भिक्षा मागतो पण दार उघडत नाही. काही वेळाने यजमान बाई भिक्षा घेऊन येते. तेंव्हा संन्याशी तिच्याकडे रागाने पाहतो. बाई म्हणते, तुझ्या रागाने भस्म होणारा मी कावळा नाही. मी माझ्या आजारी पतीच्या सुश्रुतेत मग्न होते म्हणून उशीर झाला. संन्यासाने क्षमा मागितली व बाईच्या ज्ञानाचे रहस्य विचारले. बाईने सांगितले, गांवाबाहेर खाटिक आहे तो तुला ज्ञान देईल. तो खाटिकाकडे जातो. खाटिक कार्यात व्यस्त असतो,तो संन्यासाला म्हणतो. अमूक बाईने तुला पाठविले आहे. बैस. माझे कार्य आटोपल्यावर तुझ्या प्रश्नाचे निराकरण करतो.*

वरील (१)उदाहरणात साधक जी शक्ती मिळवतात ती शक्ती उदाहरण(२) मधील गौळण आपल्या स्वधर्माला आध्यात्मिक गति देऊन प्राप्त करते.पहिल्या उदाहरणात शब्दपांडित्यामुळे धर्मगुरू स्वतःला ज्ञानी समजतो व त्याला आपल्या अज्ञानाचे ज्ञान होते. दुसऱ्या उदाहरणात शब्दपांडित्यामुळे चमत्कार घडणाऱ्या ज्ञानाला ज्ञान समजतो, तर तिसऱ्या उदाहरणात चमत्कार घडविणाऱ्या सिध्दीला ज्ञान समजतो, पण ज्ञानी समजणाऱ्या पंडितांचे अज्ञान उघड पडते व कार्यातील निष्ठाच चमत्कार घडवते. हा चमत्कार कार्यातील आध्यात्मिक गती असते.कार्यातील गतीचे रहस्य जाणणारा ज्ञानी कार्यातील ईश्वरभक्तीमुळेच ज्ञान प्राप्त करून घेतो.

**सर्व कर्म अखिलं पार्थ ज्ञाने परि समाप्यते**

(गीता ४–३३)अर्थात सर्व कार्याचे ज्ञानात रुपांतर होते.

## १.२)विकासचक्र प्रवर्तन अर्थात अमृतंगमय जीवन प्रवास (**Spiritual journey** ) :

Every human is spiritual beings having a human experience.

विकासचक्र प्रवर्तन अर्थात जीवनप्रवास विकासमार्गावर होणे.यासाठी प्रवास **अशाश्वताकडून शाश्वताकडे** अर्थात **अमृतंगमय** असावा .म्हणून श्रीकृष्णाने ईश्वरज्ञानाचा आश्रय सांगीतला.जीवनमार्गात ज्ञानाचा आश्रय करणे ही ज्ञानी भूमिका ठरते.प्रकृति व ईश्वरज्ञान यातील श्रेष्ठत्वाचा क्रम अनुक्रमे इंद्रीयाचे विषय,कर्म करणारे इंद्रीय,मन,बुद्धी,आत्मा व त्यापलीकडे परमात्मा (ईश्वर)असा असतो.मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ ठरते.बुद्धीतील संशय दूर करण्यासाठी ईश्वरज्ञानाचा आश्रय असतो.ईश्वरज्ञानामुळे बुद्धियोग

लाभतो.बुद्धियोगामुळे जीवनमार्गासाठी ज्ञानी दृष्टी लाभते व जीवन प्रवासातील ज्ञानविज्ञान जाणतो .जीवनप्रवासातील सुख,ज्ञान व कार्य ईश्वरज्ञानाशी (सत् )जोडले जाते.सुख,ज्ञान व कार्य यातील सतगुण जाणतो.

वर्तमानात जसे ज्ञान असते,तसा मनुष्याचा जीवन प्रवास होतो.हा प्रवास स्वत:चा असतो. स्वत:चा मार्ग चालण्यातच बुद्धीचा वापर होत असतो . प्रवास करताना रस्ता हरवला तर बेभान होतो.अस्थीर होतो.व रस्ता सापडला कि आनंदीत होतो. वास्तवात रस्ता जागेवरच असतो.जीवन प्रवास कळला तर सुखाचे रहस्य कळते.ध्येय कळले तर जीवन प्रवास कळतो. यासाठी शरीररूपी जे वाहन मनुष्याला मिळालेले आहे त्याचे ज्ञानविज्ञान गीतेत आहे.पाण्यात नाव वाहणे व नाव वल्हवणे यातील भेद कळतो. प्रकृतीतील द्वंद्व बंधन असते.यामुळे नाव वाहत राहते.जीवनमार्ग पक्का करणे याचे ज्ञान गीतेत सांगीतले.

मनुष्याच्या जीवनमार्गाला त्याचे सुखदु:ख मार्गदर्शन करते.दु:ख आले की प्रज्ञावादी भूमिका घेतो.व ज्ञानी समजतो.पण जीवनज्ञान नसल्यामुळे अज्ञानी ठरतो. जीवनात प्रज्ञावादी संवय प्राकृतिक(जडवादी)अवस्था दर्शविते,प्रकृति सत् ,रज व तम या तीन गुणाने बद्ध असते.याच आधारावर चांगले असो वा वाईट,सक्षम असो वा दुबळे,श्रीमंत असो वा गरीब,धार्मिक असो वा नसोत,प्राकृतिक अवस्थेत संपूर्ण जगच जगत असते.प्राकृतिक अवस्थेत विविध विभागण्या असल्या तरी सत् –असत् ही विभागणी जीवनातील ज्ञान–अज्ञान दर्शविते.

**न असतो विद्यते भावो न अभावो विद्यते सतः**
**उभयोःअपि दृष्टो अंतः तु अनयोः तत्वदर्शिभिः**

अर्थात जे बदलते ते असत् व जे बदलत नाही,शाश्वत आहे ते सत् .ज्ञानी या दोहोतून निर्णय करतो.जीवनाची ज्ञानी पातळी धारण करण्यासाठी सत् आणि असत् याच विभागणीचा आधार आध्यात्मिक क्रांती घडवून आणते.जीवनात ज्ञानी दृष्टी धारण करणे व स्वतःला जीवनाच्या उच्च मार्गावर (जीवनाची ज्ञानी पातळी)आणणे हा दृष्टीबदल होण्यासाठी आध्यात्मिक क्रांतीची संकल्पना
स्पष्ट झालेली आहे.

आत्मविकास जीवनविकास असतो.जीवनाच्या ज्ञानी पातळीवर ज्ञानी मानसिकता असते.ही आत्मवश अवस्था असते. मनोवश अवस्था प्राकृतिक असते.अहंकाराचा आश्रय हेच प्रज्ञावादी संवयीचे कारण असते व प्राकृतिक अवस्था ठरते.प्रज्ञावादी संवयीमुळेच अज्ञान असते.हेच अज्ञान दूर करण्यासाठी स्वतःमध्ये आध्यात्मिक क्रांती घडवून आणणे म्हणजे जीवनात सकारात्मक होणे.यासाठीच अहंकाराचा आश्रय(प्रकृति) व ईश्वरज्ञानाचा आश्रय (ज्ञान) यातून ईश्वरज्ञानाची निवड करणे.व अमृतंगमय या मार्गावर जीवन प्रवास करणे.जीवनप्रवास प्रकृतिकडून ज्ञानाकडे अर्थात **असतो मा सत गमय** असा होतो.

कर्म या संदर्भात चांगले कर्म सत असते,जीवनप्रवासाची दृष्टी **अ**सतो मा सतगमय अशी असते.

भक्ती या संदर्भात जीवनात मृत्यु आहे,दुःख आहे.जीवनप्रवास **मृ**त्योर्मा अमृतंगमय असा होतो.

ज्ञान या संदर्भात जीवनप्रवासात संशयामुळे अंधार वाटतो.जीवनप्रवास **त**मसो मा ज्योतिर्गमय असा करतो.

## अ.विकासचक्र प्रवर्तनाची ज्योत :बुद्धियोग (Connect with GOD) :

**Everything has beauty,but not everyone can see.- Confucius**

जग सुंदर आहे आणि या सुंदर जगात आपले स्वतःचे जीवन सर्वात सुंदर असते.कारण सुंदर मनच जगातील सुंदरता जाणत असते.मनुष्य जीवन रहस्यमय आहे. या जीवनाचे रहस्य उलगडण्यासाठीच मनुष्याला बुद्धीची महान देण प्राप्त आहे. या बुद्धीद्वाराच त्याला जीवन रहस्य उलगडून सत्याचा शोध लागतो. हा सत्याचा शोध म्हणजेच निरंतर प्रगती ठरते त्याचे स्वतःचे जगणे ठरते. जीवनच संगीत बनते ज्यामुळे स्वतःला आनंद मिळतो व त्याचा मंजूळध्वनी जगालाही आनंदित करतो.जगात बुद्धीचाच चमत्कार दिसतो. बुद्धीचा वापर करूनच विकास होतो.

एकच संवय जीवनात अडथळा निर्माण करते.स्वभावनियत प्रकृतिनुसार जगणे व प्रज्ञावाद (समर्थनासाठी ज्ञानाचा वापर) बोलणे ही जीवनाची स्वाभाविक संवय आहे.अर्जुनाने निष्क्रियतेचे समर्थन केले प्रज्ञावाद वापरला व शास्त्राचा आधार देऊन स्वतःला ज्ञानी समजतो. याच बिंदूवर अज्ञान दर्शविले. ही ज्ञानी भूमिका नसून दुबळी ,अज्ञानी भूमिका आहे हे श्रीकृष्णाने सांगीतले.प्रज्ञावादी भाष्यकार मुख्य प्रश्नाला,विषयाला बगल देतात व आपला विषय बनवतात.मुख्य विषयाची हवा काढून घेण्याचा तो प्रयत्न ठरतो.आपल्या पूनर्स्थापीत विषयावर लक्ष वेधण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

संवादात जलपा,वितंड,वाद व संवाद या प्रकाराचा समावेश असतो.मीच योग्य असे स्वतःचे समर्थन हा जलपा,इतरांना चुक ठरविणे हे वितंड, बरोबरीत संवाद साधणे हा वाद तर शिष्य –गुरू संवाद हा संवाद असतो.अर्जुनाचा प्रज्ञावाद जलपा होता.अर्जुनाने युध्द करणे वा न करणे यात श्रेयस्कर काय? यातील अज्ञान कबूल केले पण युध्द टाळणे हा अर्जुनाने आता विषय बनविला होता. प्रज्ञावाद मुख्य विषयाची हवाच काढून टाकतो. तेंव्हा श्रीकृष्ण अर्जुन संवादाद्वारे कार्यशाळा झाली.(प्रज्ञा)बुद्धिवादाला लगाम बसली आणि बुद्धिची सक्षमता(बुद्धियोग) या विषयावर कार्यशाळा सुरू झाली.कार्यशाळेत वाद व संवाद असतो.कार्यशाळेचा मुख्य विषय(Agenda) असतो.चांगल्या मनुष्याला दुबळेपणा शोभत नाही म्हणून

बुद्धीची सक्षमता (Strong -positive and stable State of Mind) हाच संदेश भगवत्गीतेचा मुख्य विषय यनला..

**यं हि न व्यथयन्तेते पुरूषं पुरूषर्षभ**
**समदुःख सुख धीरं सो अमृतत्वाय कल्पते** (गीता २-१५)

अर्थात ज्ञानी तोच जो जगतांना व्यथीत होत नाही. आत्मविश्वासाने कार्याचा मार्ग चालतो.हाच मार्ग चालून(शाश्वत) सुखाची साधना करतो.**हाच अमृत** प्रवास ठरतो.प्रश्नाचे निदान झाले. याच बिंदूला केंद्रबिंदू करून अर्जुनाला जे जे प्रश्न सूचले त्याचे निराकरण केले व विकासचक्र प्रवर्तीत झाले .

वर्तमान भविष्याची पूर्वस्थिती (Precondition) असते.व्यवहारात ' मी योग्य आहे 'हा प्रज्ञावादाचा आधार असतो.तर ज्ञानी 'मी योग्य आहे' हा आत्मविश्वास कार्याच्या पूर्वस्थिती (Precondition)चा आधार करतो. ज्ञानी होणे म्हणजेच प्रज्ञावादी संवय बदलवून बुध्दियोगी होणे.जीवनमार्गात प्रकृति व बुद्धी यांची स्वतंत्र भूमिका असते. प्रकृतितील द्वंद्व बुद्धीमध्ये संशय पेरत असतो.व मार्ग चालण्यासाठी अडथळा करते.जीवंत उर्जा म्हणजे ईश्वर तत्व प्रकृतिला संचालीत ठेवते.संशयमुक्तीसाठी ईश्वरज्ञानाचा वापर करणे ही आध्यात्मिक क्रांती असते.बुध्दियोगच मनुष्याला विकासासाठी कार्यरत करतो.स्वतःचा जीवनमार्ग जाणतो.मार्ग पक्का करुन योग अर्थात सक्षमतेची साधना करणे ही विकासाची दृष्टी बुध्दियोगामुळे लाभत असते..

बुद्धियोगामुळे ंस्वतःचा मार्ग चालत असतो.हेच स्वातंत्र्य ठरते.सुखाचा संबंध मन(इंद्रियविषयसुख-भोगऐश्वर्य),ंबुद्धी(ज्ञान) व आत्मा(स्वातंत्र्य) याचेशी असतो.ज्ञानाचा संबंध ंबुद्धीशी असतो. बुद्धीचा संबंध मानसिकतेशी असतो, जीवनात मानसिक दुर्बलता दु:खाचे कारण ठरते.निरोगी मानसिकता हीच सुखाची मानसिकता (दृष्टी) ठरते. बुद्धीची स्थीरता स्वत:च्या ंबुद्धीला दुर्बल विचारापासून मुक्त ठेवते ,ंम्हणून ंबुद्धीची स्थीरता येण्यासाठी(बुद्धी जागेवर ठेवणे) ,सकारात्मक होण्यासाठी अर्थात सुखी जीवनासाठी बुद्धीला ईश्वराशी जोडणे.(Connect with the GOD)हा बुद्धियोग आहे.

**बुध्दियोग प्राप्ती :** बुध्दियोग प्राप्ती आध्यात्मिक क्रांतीचे प्रथम पाऊल ठरते.यामुळेच दृष्टीबदल होतो. रॉबर्ट ग्रीन इंगरसॉल म्हणतो, (What light is to the eyes, Liberty is to the Soul of man )डोळे व प्रकाश याचे जे नाते असते,तेच नाते आत्मा व स्वातंत्र्य याचे असते.ंस्वतःतील ज्ञान जागृत असले तरच आत्मविश्वास असतो.ंविश्वासासाठी ईश्वरज्ञान असते.ंस्वतःचे शाश्वत ज्ञान जाणले तर ईश्वरज्ञान जाणतो.ईश्वरज्ञानामुळे बुद्धियोग मिळतो.

**यथा प्रकाशयति एकः कृत्स्नं लोकम् इमं रविः**
**क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत**(गीता १३-३३)अर्थात

जसा सूर्य संपूर्ण सृष्टीला प्रकाशीत करतो तसेच शरीर संचालीत.करणारे शाश्वत तत्व–क्रांतीसूर्य शरीराला प्रकाशीत करतो.आध्यात्मिक क्रांतीमुळे ईश्‍वरज्ञान क्रांतीसूर्याचेच कार्य करते. ईश्वरज्ञानामुळे बुद्धियोग लाभतो.

प्रार्थना, ईश्‍वरभक्ती, धार्मिकता, सतप्रवृत्ती याद्वारा व्यक्तीची ईश्‍वरावर श्रध्दा असल्याचे प्रमाण असते. मनुष्य धार्मिक असतो ,चांगला असतो,तरीपण दु:खी होतो तेंव्हा ज्ञानी समजून प्रज्ञावादी भूमिका घेतो.जगातील तसेच स्वतःतील चांगलेपणाचे ,शक्तीचे अज्ञान असते,जो चांगला आहे त्याला दुर्बलता शोभत नाही .दुर्बलतेला कारण ठरलेला संभ्रम ह्रदयातील ईश्‍वररुपी ज्ञानदिपाने दुर करून ज्ञानी होणे म्हणजे ईश्‍वरज्ञानाद्वारे व्यक्तीगत मनाला –जीवनाला वैश्विक शक्तीशी जोडणे .यामुळे आत्मविश्वास येतो.जाहिरातदार ग्राहक आकर्षित करण्यासाठी वस्तुची जाहीरात करतो. जाहीरातीत (वस्तुचा उपयोग जाणून) रमणे व वस्तु विकत घेण्यासाठी विक्रेत्याने दिलेली बुध्दी अशी प्रक्रिया असते.ईश्‍वर सृष्टीचा अध्यक्ष या ज्ञानाला जाणून त्या ज्ञानात रमणे यामुळे बुध्दियोग मिळतो.

**ददामि बुद्धियोगं तं येन माम उपयान्ति ते.**(गीता १०–१०)

**ब. विकासचक्र प्रवर्तन :** बुद्धियोग **विज्ञान व** अध्यात्म यांचा संयोग करतो. कार्य व धर्म यांचा संयोग अथवा व्यवहार **व आदर्श** यांचा संयोग **अथवा** प्रकृति व ईश्वरज्ञान यांचा संयोग **विज्ञान व** अध्यात्म यांचाच संयोग ठरतो.गीतेत सृष्टीचे संचलनचक्रातील यज्ञतंत्र रहस्य सांगून यज्ञतंत्राचा वापर विकास चक्रात जीवनमार्गांच्या व्यवस्थापनासाठी केला.संचलनचक्रात प्रकृति कार्यरत असते.विकासचक्रात जीवनाचा कार्यमार्ग पक्का होणे, प्रसन्नचित्त स्थीरबुध्दीचे लक्षण असते.यासाठी विकासचक्रात स्वतःला कार्यरत करणे,कार्यमार्ग पक्का करणे याचा समावेश होतो.

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः**
**तत्र श्री विजयो भूति धृवा नीतिर्मतिर्मम** (१८–७८)

अर्थात कार्यकौशल्य साधलेला व्यक्ती व ईश्वरज्ञान यांचा संयोग जेथे आहे अर्थात ज्याने ज्ञानी भूमिका धारण केली आहे अशा कार्यकुशल व्यक्तीला ऐश्वर्य(श्री) विजय, शक्ती (भूति) प्राप्ती निश्चीत आहे.त्याचाच मार्ग कल्याणाचा व नीतीचा आहे.ईश्‍वरगती त्याचे जीवनयात्रेला सहकार्य करीत असते .त्याचे जीवनसंचलनचक्र सृष्टीचे संचलनचक्राला सहकार्य करीत असते( Walk with GOD ).हेच विकासचक्र प्रवर्तन ठरते.जीवनमार्ग अमृतंगमय असा होतो.

## १.३) विकासचक्रातील ज्ञान,कर्म व भक्ती याची ज्ञान, विकास व सुख यात विभागणी:

Mindsets play strange tricks on us.We see things the way our minds have instructed our eyes to see.

जीवनाचे विकासचक्रात ज्ञान,कर्म व भक्ती हा आधार असतो. जीवनविकास**मार्गात** ,ज्ञान , विकास व सुख याचा समावेश होतो. ज्ञानाने जीवनविकासचक्रातींल ज्ञान , विकास व सुख याचीं दृष्टी मिळते.ज्ञान,कर्म भक्ती या संदर्भात ज्ञान, विकास व सुख याचा संबंध सृष्टीचे प्रवर्तनचक्र व जीवनविकासचक्र या दोहोशी असतो. ईश्वर सृष्टीचे संचलनचक्र प्रवर्तीत करणारा अध्यक्ष असे ईश्वरज्ञान होणे हेच सृष्टीचे प्रवर्तनचक्रातील ज्ञान बुद्धियोग असतो.बुद्धियोगामुळे होणारा दृष्टीबदल जीवनाच्या विकास चक्र प्रवर्तनाचा आधार ठरतो.

## अ. ज्ञान (**दृष्टी** )

जीवनात सकारात्मक भूमिका होण्यासाठीच ज्ञानाचा वापर होतो. आपण काय करू शकतो, त्यातही मी काय करू शकतो याचा आत्मविश्वास येणे व स्वत:चा मार्ग चालताना योगसाधना करणे हे मानसिक शक्तीचे ज्ञान जीवनमार्गातील ज्ञान आहे.मनुष्याचा जीवनमार्ग सुखप्राप्तीसाठी कार्याचे व्यवस्थापन असते.ही प्रकृती आहे.पण कार्याद्वारे योग साध्य करणे म्हणजे बुध्दीची स्थीरता साध्य करणे .यामुळे नकारात्मक विचार बुध्दीवर आक्रमण करीत नाही. जगण्यात ज्ञानी भूमिका अनुभवतो.हेच व्यावहारिक सत्य भगवतगीतेतून जगासमोर आले.ज्ञानी दृष्टी जीवनमार्गातील ज्ञानविज्ञान जाणते.विकास मार्गातील निर्णय अधिकार जाणते. प्रश्नाचे निदान करते.स्वतफला विकास मार्गावर आणते.जगात व्यवस्थापन असते.म्हणून योजक दृष्टी जाणते.ज्ञानामुळे हाच दृष्टीबदल होतो. ज्ञानी भूमिकेत्त प्रश्नाची उकल करणे ही वैज्ञानिक दृष्टी व साध्य(ध्येय)ठरवून मार्ग ठरविणे ही योजक दृष्टी अशी ज्ञानी दृष्टी असते.याच आधारावर ज्ञानी दृष्टी असलेली ज्ञानी भूमिका व प्रज्ञावादी (advocacy) भूमिका (प्राकृतिक अवस्था )यातील भेद स्पष्ट करते..

## ब). सुख–

**वर्तमानातील सुखाचे ज्ञान (प्रकृतीसुख**–Comfort **व सतसुख**–happiness**फ)**– जीवनात सुखाची दृष्टी स्वतःची असते.सुखाच्या दृष्टीनुसार सुखी असणे वा दुःखी असणे याची निवड होत असते. सुख दुःख जीवनमार्गात मार्गदर्शक ठरतात.अर्जुनाला दुःख झाले .हे दुःखच शाश्वत सुखासाठी ( योग ) मार्गदर्शक ठरले.योगक्षेमासाठी कार्यरत असणे ही प्रकृति आहे . व्यवहारात प्राप्ती इच्छा (वैभव, किर्ती, स्वर्ग इ.) व यासाठी कार्य ही प्रकृती असते.अर्थात प्राकृतिक सुखासाठी कार्यरत असतो.संशय प्रकृतिमुळे

असते,प्रकृतिमध्ये द्वंद्व (आसक्ती–द्वेंष )असते.द्वंद्वामध्ये अडकणे हाच अडथळा ठरतो.यामुळे वर्तमानातील मुळ प्रश्नावरून लक्ष उडते. '

प्रकृतिनुसार जगणे व प्रज्ञावादी प्रवृत्तीनुसार भाष्य करणे यामुळे मनुष्य प्राकृतिक पातळीवरच जगत असतो.'मानसिक दुर्बलता आली तरी प्रज्ञावादी (स्वसमर्थन) प्रवृत्तीतच सुख शोधण्याची संवय असणे ही प्रकृती असते.तुलना, समर्थन यासाठी बुद्धीवाद वापरतो.बुद्धीवाद मनाला समाधान (Comfortable) देण्यासाठी सुखाचे साधन करतो.हे सापेक्ष (Comfort-illusion of happiness)सुख असते,शाश्वत नसते. प्रज्ञावादी प्रवृत्तीमुळे आपल्या विकासाचे कारण आपण स्वत: आहे व दोषाचे कारण(इतर) जग आहे असा मनुष्याचा समज होतो.कधी आपल्या दैवाला दोष देतो.आपले अज्ञान वा चुक कबूल करीत नाही.यामुळे नकारात्मक दृष्टी बनते.

सामान्य पातळीवर व्यक्ती जे प्रत्यक्षात घडत असते त्याला दैवयोग म्हणतो.तर ज्ञानी जीवनाचे प्रयोजनात दैव जाणतो व जीवनाला ईश्वरज्ञानाशी जोडणे या ज्ञानाला योग जाणतो.हा 'योग' शक्ती या अर्थाने असतो.बुद्धियोगामुळे सुखाची सकारात्मक दृष्टी लाभते.बुद्धीची स्थीरता व यासाठी योगसाधना हे शाश्वत(सत) सुखाचे ज्ञान ठरते. आपल्याजवळ जे संसाधन आहे त्याचा आत्मविश्वास असतो. आध्यात्मिक क्रांती सुखाची दृष्टी बदलवते.हेच ज्ञान आध्यात्मिक व्यवस्थापनाचा आधार ठरते. '

जशी दृष्टी तसे दिसते.संत कबीर मानवात साधू पहात होते.**कहत कबीर सूनो भयी साधो** ही हाक साक्ष आहे.संत कबीर म्हणतात – '

**बूरा जो देखण मै चला,बूरा न मिला कोय.जो मन खोजा आपणा तो मूझसे बूरा न कोय.'**

नकारात्मक दृष्टी असेल तर स्वतःतील अज्ञान दिसत नाही. सकारात्मक दृष्टी असेल तर जगातील सुंदरता तर दिसतेच पण स्वतःतील सुंदरता दिसते.यामुळे आत्मविश्वास असतो .अज्ञानी अज्ञानात (नकारात्मक भाष्य ) रमतो.ज्ञानी ज्ञानात (सकारात्मक भाष्य ) रमतो.सकारात्मक मानसिकता धारण करणे हाच आध्यात्मिक क्रांतीचा उद्देश आहे .सुखाची दृष्टी सकारात्मक असेल तर जीवनाची भूमिका सकारात्मक बनते.जीवनाची सकारात्मक भूमिका सुखाची ज्ञानी(सतसुख) दृष्टी ठरते. '

**सुखी अवस्था ( स्थितप्रज्ञ रहस्य )–:**

सुखासाठी सर्व जगच जगत असते.प्रकृतिसुख (Comfortable)व सतसुख (stronger state of mind) हा सुखाचा आधार ठरतो.सकारात्मक विचार,साहस,निर्भयता,दृढता मानसिक शक्ती दर्शवते.सुखाचे रहस्य मानसिक शक्ती ,व मानसिक शक्तीचे रहस्य स्थितप्रज्ञ या शब्दाद्वारा भगवदगीतेत स्पष्ट केले सुखासाठ. ही अवस्था साध्य करण्यासाठी कार्याद्वारे सुखाची साधना व्हावी यासाठी योग (वैश्विक शक्तीशी जोडणे) या शब्दाचे प्रयोजन केले. ही मानसिक शक्ती कार्याद्वाराच प्राप्त करणारा, त्या मार्गावर असणारा ज्ञानी ठरतो.

**क) विकास :** ज्ञानाचे संदर्भात बुध्दीवरील संस्कार, प्रकृती संदर्भात कार्य व सुखाचे संदर्भात स्थीर बुध्दी या ज्ञानानुसार जीवनाची विकास दृष्टी विकसीत होते.मनुष्यजन्म कार्यानेच ओळखला जातो.कार्य व जीवनमूल्ये याद्वारा कार्यकौशल्य साध्य होते व जीवनमार्ग बनत असतो . कार्याकडे पाहण्याची दृष्टी विकासदृष्टी असते. स्वतःच्या विकास दृष्टीनुसार जीवन सुरू असते. प्रकृतितील गुणविकास आत्मविकास असतो.जसे जीवनात पैशाचे मूल्य कळते व पैसाप्राप्तीसाठी स्वत:ला कार्यरत करतो,तसेच जीवनमूल्ये कार्यरत करतात.जीवनमूल्यामुळे कार्याची मूल्यवृद्धी होते व कार्य जीवनविकासाचे साधन बनते.जीवनमूल्याचे ज्ञान असलेला धर्म शाश्वत धर्म ठरतो. जो जगातील कोणत्याही व्यक्तीला उपयोगी ठरतो. निर्णय अधिकारासाठी स्वावलंबन,निश्चय पक्का होण्यासाठी वचन,समर्पीत कार्य होण्यासाठी स्वधर्म, निश्चयाची प्रामाणीकता होण्यासाठी कर्मयोग अशी जीवनमूल्ये जीवनमार्ग पक्का करतात.याप्रमाणे स्वत:च्या मार्गावर स्वत:च (स्वधर्म )शिक्कामोर्तब केले तरच योगमार्ग (Walk with God )बनतो.हेच जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन असते. जीवनाचे विकासचक्र प्रवर्तित करते.

**विकासचक्रातील विभागणी**

**–सुखाचा विचार (१)**

***ज्ञान**

सुख –सुखाची दृष्टी (२)

ज्ञान–ज्ञानाची दृष्टी ,(३)

विकास– विकासाची दृष्टी (४)

* विकास

**–विकासाची भूमिका,(५)**

**– विकासाची कृति (साधना)(६)**

**–सुखाचीं साधना (७)**

---

# २

# विकासचक्र

**१. सुखाचा विचारः** (HappyThoughts **)**

***ज्ञान**

**२.सुखाची दृष्टीः (** State of MIND -Confidence **)**

**३. ज्ञानी दृष्टी :(**Vision of Knowledge) **(ज्ञान,विज्ञान व अज्ञान भेद )**

**४. विकास दृष्टी–आध्यात्मिक व्यवस्थापन(VISION of Developement)**

***** विकास

५) **विकास भुमिका : (Leadership / Honour yourself )**

**६) विकास मार्ग – स्वतःचे शिक्कामोर्तब हेच स्वातंत्र्य (Right of Governing Self)**

७) **सुखाची साधना** (Devotion **)**

**१. सुखाचा विचारः** (Happy Thoughts **)**

No pessimist ever discovered the secret of the stars,or sailed to an uncharted land or opened a new doorway for the human spirit - Helen Keller

*गोष्ट– तीन व्यक्ती खांद्यावर पिशव्या टाकून प्रवास करीत असतात. एक पिशवी पुढे असते दुसरी पाठीमागे असते. पहिला व्यक्ती म्हणतो, मी पुढच्या पिशवित माझे भूतकाळातील दुःख भरत असतो व मागच्या पिशवीत माझे चांगले कर्म, सुख भरत असतो. पण सुखाचा विचार नजरेआड पडल्यामुळे दुःखाचा भार होतो. या व्यक्तीच्या प्रवासाची प्रगती स्वल्प असते. दुसरा व्यक्ती म्हणतो पुढच्या पिशवित माझे चांगले कर्तृत्व व सुख भरलेले आहे. ते लोकांना दर्शविण्यासाठी वारंवार काढावे लागते. पाठीमागील पिशवित माझ्या*

*चुका व दुःख भरीत असतो, त्याचे वजन झाल्यामुळे माझा प्रवास मंदावतो. या दोन्ही व्यक्ती सामान्य पातळीवरील असतात .जीवन जगतांना सुखासाठी जीवनप्रवास करतात,पण दुःखाचा भारच गोळा करीत असतात.वर्तमानात दुःखाचा भार वाहत जगणे यामुळे जीवनप्रवासाची गती  मंदावते.मानसिकता दुबळी व नकारात्मक बनते.तिसरा व्यक्ती ज्ञानी  असतो. तो म्हणतो पुढील पिशवित मी जगातील लोकांविषयी आश्चर्यकारक, प्रभावी विचार, त्यांचे चांगले कर्तृत्व व माझे चांगले कर्तृत्व भरत असतो. ही पिशवि मोठी आहे पण मला भारी नाही, ती मला सतत जगण्याची दृष्टी देते व आनंदाने यात्रा करण्याची प्रेरणा देत असते. पाठीमागच्या पिशविला मी खाली छिद्र केले आहे. जगाविषयी अनावश्यक वाईट विचार त्यात भरत असतो, कधी माझ्याविषयी दुबळे व वाईट विचार आले तेही त्यात भरत असतो. तिचा मुळीच भार नाही कारण छिद्रामुळे ती नेहमी रिकामी होते, यामुळे जीवनयात्रा गतीमान राहते. तिसरा व्यक्ती  बुद्धियोगी ठरतो, त्याची जीवनयात्रा ज्ञानी पातळीवर चालू असते. अर्थात सकारात्मक उर्जा त्याची जीवनयात्रा गतीमान करते.*

**विचाराचा परिणाम :** दुबळी मानसिकता भय, दुःख, चिंता यामुळे होत असते.या संदर्भात व्यक्तीची मानसिक अवस्था व त्याचा परिणाम रामायण व भगवद्गीता यातील कैकयी व अर्जुन यांच्या तुलनात्मक भूमिकेतून स्पष्ट होते.रामायणात कैकेयीची मानसिक अवस्था अस्थिर करण्यासाठी मनथरेने भयभीत करणाऱ्या कथा सांगितल्या .महाभारतात अर्जुन दुबळा झाला. भय, चिंता, क्रोध इत्यादी विकारांमुळे अस्थिरता येते. स्मृतिभंश अर्थात भ्रम होतो. मानसिक स्थिती बदलली की, दृष्टी बदलते. घटना तीच असते पण दृष्टीमध्ये बदल होतो. दृष्टीबदल होण्यासाठीच मनथरेने कैकेयीला  कथा सांगून दुबळे केले.  कैकेयी स्वतःच्या दैवाला दोष देते. जे आप्त प्राणप्रिय वाटत होते. तेच आता शत्रूवत भासत होते. कैकेयीचे जग तिला अहितकारक वाटते. येथे कैकेयीची जीवनदृष्टी व्यावहारिक होती. म्हणूनच मनथरेने भाग्योदयासाठी उपाय सांगितला व स्वतःचा सल्ला कैकेयीच्या गळी उतरविण्यात मनथरा यशस्वी झाली. तर अर्जुन प्रज्ञावादी अवस्थेत स्वतःच्या भूमिकेला धर्मात्मा अर्थात ज्ञानी समजतो. सुखाच्या चुकीच्या संकल्पनेमुळे (लाभ, स्तुतीसाठी चांगले म्हणावे) किंवा अंधश्रद्धेमुळे आंधळा विश्वास असतो व व्यवहारात फसगत होते किंवा निराशा येते.आत्मविश्वास डोळस विश्वास असतो,

**संशयात्मा विनश्यति** (गीता ४–४०) :संशय विनाशाचे कारण ठरते. जीवनमार्गात भ्रम निर्माण झाला, दुर्बलता आली तेव्हा.मनात संघर्ष उत्पन्न होतो. आपल्या मनातील संघर्ष मिटविण्यासाठी आपल्या निष्क्रीयतेचे समर्थन करतो.आपली भूमिका योग्य (सामर्थ्यच आहे) आहे हे दर्शविण्यासाठी स्वतःच्या भूमिकेवर आदर्शाचे शिक्कामोर्तब करून आपली भूमिका ज्ञानी दर्शविणे ही सामान्यतः संवय समाजात आढळते. हा प्रज्ञावाद ठरतो. ती जीवनाची ज्ञानी भुमिका ठरत नाही. प्रज्ञावादाला विशिष्ट संदर्भ असतो. हा संदर्भ जीवनाकडे पाहण्याची दृष्टी दर्शवीत असते.जशी स्वतःची ओळख असते तसे विचार असतात.दुबळ्या

अवस्थेत नकारात्मक विचार आकर्षित करीत असतो किंवा त्या विचारात रमत असतो. व्यर्थ विचारात रमण्याची संवय मनुष्याची दुबळी किंवा अज्ञान अवस्था दर्शविते. नकारात्मक विचारात रमणे केवळ आळस नसून स्वतःचा स्वतःलाच अडथळा होत असतो.

**सकारात्मक विचारात रमणे :** युद्ध लढण्यापूर्वी युद्ध डोक्यात जिंकलेले असते, म्हणून सकारात्मक विचार हाच सुखाचा विचार असतो.जगातील मानसशास्त्रज्ञांनी सकारात्मक विचाराचेच महत्व प्रकाशात आणलेले आहे. सकारात्मक विचार वि**श्वासाची** पेरणी तर नकारात्मक विचार संशयाची पेरणी करीत असते. मनोविश्लेषक तज्ञ डॉ. सिगमांड फ्रॉईडचे अनुसार मनुष्याच्या अबोध मनात आंतरिक इच्छा आणि सुप्तवासना वसलेल्या असतात. यामुळे अबोध मन मनुष्याच्या बाह्य वर्तनावर परिणाम करतात. अबोध मन (चित्त) व त्याचे कार्य याचे अज्ञान असल्यामुळेच मनुष्य (भौतिक) प्राप्तीसुख निर्मित दुःखामुळे विचलीत होतो व प्रज्ञावादात (स्वसमर्थन) रमतो. रमणे हेच त्याचे सुख असते. परंतु या अवस्थेत नकारात्मक विचारात रमतो, ते मानसिक दुर्बलतेचे लक्षण ठरते. तर अबोध मनाचे ज्ञान असलेला ईश्वरज्ञानाने या मनाला (चित्ताला) सक्षम करीत असतो व प्राप्तीसुख निर्मित दुःखाने (अभाव)विचलित होत नाही. चित्ताचे सक्षमीकरणच चित्तशुद्धी ठरते. या अवस्थेत सकारात्मक,कल्याणप्रद प्रसन्न विचारात रमतो. हीच जीवनातील ज्ञानी अवस्था ठरते.

**बुद्धियोग प्राप्ती :** जसे कारखानदार जाहीरात करतो,आपली वस्तु ग्राहकाने विकत घ्यावी,हे बुद्धीत पेरणे,हाच हेतु असतो.ईश्वरज्ञानाची बुद्धीत पेरणी हा बुद्धियोग असतो. मनुष्य प्रार्थना, ईश्वर भक्ती आपापल्या धर्मानुसार करीत असतो.म्हणूनच प्रवचन कीर्तन यात रमतो. तेव्हा ईश्वरावर श्रध्दा सिद्ध होते. शाश्वत अमृत धर्माची ओळख झाली तर ईश्वर या वैश्विक शक्तीची ओळख सृष्टीचे संचालन करणारा अध्यक्ष अशी होते.जग ईश्वर संचालित आहे व प्रत्येक मनुष्यात ईश्वराचा वास आहे. म्हणून ईश्वर ज्ञानात रमणे म्हणजे आध्यात्मिक क्रांती द्वारा विचाराची पातळी बदलवणे .हाच बुद्धियोग असतो.बुद्धियोगामुळे क्रांतीचक्र प्रवर्तीत होते.जग संसाधनांचा खजिना आहे .ईश्वरज्ञानामुळे जगाविषयी सकारात्मक विचार करतो व सकारात्मक विचारात रमतो

**कथयंतश्च माम नित्यं तुष्यन्ति च रमंन्ति च** (गीता १०–९)

अर्थात.सृष्टीमधील सकारात्मक भाव , चांगलेपणाची शक्ती.वैभव ईश्वराच्या विभूति आहेत या ईश्वरज्ञानात रमणे म्हणजे बुद्धीतील नकारात्मक दुबळया विचाराचे प्रदूषण दूर करणे.जगातील रचनात्मक, विधायक, सत्कृत्य ईश्वराचेच प्रातिनिधिक रूप विभूतिद्वारा व्यक्त होते. म्हणून सकारात्मक विचारात रमत असतो. ईश्वराचे सृष्टी संचालनाचे ज्ञान त्याला सुख, ज्ञान व विकास याची दृष्टी देते. .

## २.सुखाची दृष्टीः ( State of MIND -Confidence )

The only thing worse than being blind is having sight but no vision.Keep your face to the sunshine and you cannot see a shadow. -Helen Keller

**जीवनाची सकारात्मक व नकारात्मक ओळख :** माझी भूमिका योग्यच हा व्यक्तीगत सुखाचा भाग असतो. हा आत्मविश्वास असेल तर करावयाच्या कार्याचा मार्ग पक्का असतो. स्वतःची ओळख सकारात्मक (ज्ञानी) असते. *Cow realizes the importance of tail when it is lost* गाईला शेपटीचे महत्व नसते,चुकून शेपटी कापली गेली तर महत्व कळते.जे आहे त्याचे महत्व न जाणता जे नाही त्याचे (अभाव)दुःख असणे.ही स्वतःची सकारात्मक ओळख नसते.या अवस्थेत जेव्हा आपले लक्ष, प्राप्तीकडे अर्थात आपल्याकडे काय अभाव आहे यावर केंद्रीत करतो तेव्हा कदाचीत आपल्या दैवाला दोष देतो. प्रत्यक्षात मनुष्याच्या नकारात्मक भावनाच त्याचे दैव हिरावून घेतात. यामुळे स्वतःच स्वतःचा शत्रू ठरतो.

मनुष्याची सामान्य पातळी प्राकृतीक स्वभावनियत असते.या अवस्थेत सुखाचा संबंध प्राप्तीशी असतो.म्हणून इच्छापूर्तीसाठी प्रकृतीधर्मानुसार कार्यरत अशी जीवनयात्रा सुरू असते या पातळीवर प्राप्तीवादी दृष्टी असते. पैसा, किर्ती याबरोबरच धर्मातील स्वर्गप्राप्तीही प्राप्तीवादी दृष्टी असते. प्राप्तीसाठी (इच्छा) व्यवहारमार्ग ठरवतो. याच यात्रेत दुःख आले, मनोदुर्बलता आणि तर त्याचे उत्तर व्यवहारात म्हणजे प्राप्तीत शोधतो, उत्तर मिळाले नाही तर जीवनमार्गात संशय असतो व प्रज्ञावादी होतो. अर्थात आत्मविश्वास नसतो. स्वतःला उपयुक्त व हितावह ते चांगले व स्वतःला दुर्लक्षित करणारे ते अहितकारक म्हणून चांगले व वाईट असे वर्गीकरण करतो. यामुळे जगाकडे पाहण्याची दृष्टी प्रेक्षकाची होते. या अवस्थेत जेंव्हा समाजाच्या विविध घटकावर टिका करतो तेंव्हा नकळत टीका करणारे विचारच ऐकण्याची व बोलण्याची संवय जडते. जगाविषयी चांगलेपणा जणू ऐकण्याची त्याची मानसिक तयारीच नसते. जणू समाजात चांगलेपणा चालतच नाही असे त्याचे मत बनते व यामुळेच त्याने स्वतःला जगातील रचनात्मक, विधायक, चांगले विचार ऐकण्यापासून स्वतःला दूर लोटलेले असते. या अवस्थेत वैयक्तीक मनाला वैश्विक मनापासून विभक्त केले असते.

**मानसिक अवस्था बदल :** अर्जुनाला मार्गात संभ्रम झाला व प्रज्ञावाद बोलला.स्वतःला ज्ञानी, आदर्श, म्हणून दर्शवण्याचा त्याचा प्रयत्न असला तरी तो व्यावहारिक सुखाचाच (प्राप्तीसुख) मुद्दा ठरतो. म्हणून श्रीकृष्णाने सुखाचे रहस्य सांगीतले. श्रीकृष्णाने अर्जुनाच्या भूमिकेला अज्ञानी ठरविले, या निदानाला संदर्भ जीवनाच्या आध्यात्मिक(ज्ञानी) पातळीचा होता. आध्यात्मिक संदर्भात ज्ञानी सकारात्मक व आत्मवश अवस्था असते तर संभ्रमामुळे दुबळी व नकारात्मक भूमिका मनोवश ठरते. मानसिक अवस्था बदलली की दृष्टीबदल होतो. दृष्टीबदल झाला की ज्ञानी भूमिकेचे संदर्भ बदलतात.. जीवनमार्गात भ्रम निर्माण झाला, दुर्बलता आली तेव्हा आत्मविश्वास हेच शाश्वत सुखाचे साधन ठरते.

**न एते सृती पार्थ जानन योगी मुह्यति कश्चन् ( गीता ८–२७)**अर्थात सृतिमोह आंधळा विश्वास असतो. याप्रमाणे गीतेने सावधान करून डोळस विश्वास धारण होण्यास **ज्ञानसंच्छिन्न संशयम् अर्थात** ईश्वरज्ञानाद्वारे विश्वास धारण करणे हे आध्यात्मिक क्रांतीचे प्रयोजन केले.

**अनित्यं असुखं लोकं इम् प्राप्य भजस्व माम् (गीता ९–३३)**

**किंवा ठेविले अनंते तैसेची रहावे चित्ती असू द्यावे समाधान,** सुखाने जगण्याच्या संदर्भात हे संदेश विचाराची अर्थात जीवन जगण्याची पातळी बदलवण्यासाठी आहे. ईश्वर भक्तीद्वारा समाधानी होणे यासाठी आहे.आपणाजवळ जे संसाधन आहे, त्याविषयी ईश्वराप्रती कृतज्ञ भावना (समर्पण) मनुष्याला ब्रह्मांडातील रचनात्मक शक्तीच्या समीप घेऊन जाते व वैश्विक शक्तीच्या सृजनात्मक उर्जेशी एकरूप करते. कृतज्ञता वैश्विक शक्तीला समर्पित भावना असते,त्याला उपलब्ध संसाधनाचे महत्व कळते. तर कृतघ्नता अहंकार दर्शविते. या अहंकारामुळेच स्वतःच्या प्रज्ञावादी (नकारात्मक) भूमिकेला ज्ञानी भूमिका दर्शवण्याचा प्रयत्न करतो.

**वर्तमानातील शाश्वत सुखाची दृष्टी :सत् सुख–** : प्राप्तीसुखासाठी कार्य ही जीवनाची प्राकृतिक (सामान्य) अवस्था असते. तर कार्याद्वारे चित्ताचे सक्षमीकरण (चित्तशुध्दी) ही जीवनाची आध्यात्मिक(ज्ञानी) पातळी ठरते.सतकार्यामुळे चित्तशुद्धी होते म्हणून समाजात सत्कार्याचे उपदेश धर्माद्वारे व्यक्त होतात. परंतु त्याचवेळी चांगल्याचे शोषण होते किंवा चांगले चालत नाही या आशयाचे संदेशही समाजात व्यक्त केले जातात, यामुळे चांगलेपणाविषयी गैरसमज समाजात पसरतो. .यामुळे स्वसमर्थन करण्यासाठी चांगले चालत नाही असे भाष्य करतो.

**'क्लैब्यं मास्म गमः पार्थ न एतद्त्वयी उपपद्यते'।**(गीता २–३)

अर्थात जो सात्वीक आहे, चांगला आहे. त्याला दुबळेपणा शोभत नाही. चांगले म्हणावे ही प्रकृति असते.तर चांगले होणे सक्षमीकरणासाठी गरज असते.. आध्यात्मिक क्रांतीमुळे दृष्टीबदल होतो..हाच बुद्धियोग असतो.

## ३. ज्ञानी दृष्टी :(Vision of Knowledge) (ज्ञान,विज्ञान व अज्ञान भेद )

*The increase of scienttific knowledge lies not only in the occasional milestones of science, but in the efforts of the very large body of men who with love and devotion observe and study nature - Polykarp Kusch*

**ज्ञान व विज्ञान भेद :** भगवद्गीतेतील ज्ञान ज्ञानविज्ञानाचा विषय ठरतो म्हणून मनुष्यजन्मासाठी शाश्वत धर्म ठरते.प्रकृती कार्यरत असते व ईश्वर प्रकृती संचालीत करते ,हाच शाश्वत धर्माचा आधार आहे . यातील ज्ञानविज्ञान मनुष्यात आध्यात्मिक क्रांती घडवून आणते. विज्ञान व ज्ञान यातील भेद जाणणे ही वैज्ञानिक

दृष्टी असते. या  ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करणे ही ज्ञानी दृष्टी असते.झाडावरुन  फळ  खाली पडले.यावरुन न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला.यापूर्वीही गुरुत्वाकर्षण अस्तित्वात होते पण ज्ञान झाल्यावर त्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग झाला.गुरुत्वाकर्षणाचे ज्ञान विज्ञान ठरते तर व्यावहारीक उपयोग ज्ञान ठरते.मनुष्याचा जीवनमार्ग या संदर्भात भगवद्गीतेने हीच वैज्ञानिक दृष्टी दिली. मनुष्यजीवनासाठी ईश्वरज्ञान (अध्यात्म)ज्ञान व विज्ञान यांचा संगम साधते.**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम इह विद्यते(**४–३८)अर्थात ईश्वरज्ञान सर्वश्रेष्ठज्ञान म्हणून गीतेद्वारा जाहीर झाले.जसे विज्ञानाचे ज्ञान  आहेच तसेच ईश्वरज्ञान आहेच .हेच ईश्वरज्ञान विज्ञानाचे  उगमस्थान आहे.वैज्ञानिक दृष्टी असलेला जिज्ञासू तर ज्ञानी दृष्टी  असलेला ज्ञानी पातळीवर जगत  असतो.जणू  विज्ञानाकडून ज्ञानाकडे असा प्रवास करीत असतो.

बौद्धिक  ज्ञान दोन समुहात विभागता येईल.एक भौतिक शास्त्र ( **Physical Science**),दूसरे सामाजिक शास्त्र ( **Social Science**). भौतिक शास्त्र स्थायी स्वरूपाचे असते तर सामाजिक शास्त्र मानव निर्मीत असते.काळानुरूप बदलणारी असते.बौद्धीक ज्ञान व ज्ञानी दृष्टी यातील भेद संख्यात्मक व गुणात्मक असतो.  विज्ञानाचे बौध्दिक ज्ञान वैज्ञानिक दृष्टी देते तर गुणात्मक ज्ञान ज्ञानी दृष्टी देते. ज्ञानाचा उपयोग विकासासाठी होण्यासाठी ज्ञानी दृष्टी गुणात्मक ज्ञानाची दृष्टी ठरते. व्यक्तीच्या पातळीनुसार त्याला सहजकार्य मिळणे ही प्राचीन वर्णाश्रमातील व्यावसायिक कार्याबद्दलची भूमिका होती. प्रत्यक्षात प्राकृतिक पातळीवर सर्वच व्यक्ती आपापल्या प्रकृतिधर्मानुसार कार्यरत असतात. स्वतःचा प्रकृतीधर्म जाणून कार्यकौशल्य विकसीत करण्याची संधी सर्वानाच उपलब्ध असते. आध्यात्मिक क्रांतीमुळे ही जाणीव स्पष्ट होते. स्वतःची ओळख स्वतःला होते, स्वतःचे सहजकार्य जाणतो व  कार्य कौशल्याच्या विकासदृष्टीमुळेच बौद्धिक ज्ञान कार्यात बदलवतो. भावना कार्याद्वारे व्यक्त होतात.

## (अ) **वैज्ञानिक दृष्टी :**

**स्वमतांधता :**   वर्तमानात ज्ञान विज्ञान उपलब्ध झाले. त्यांत रोज भर पडत असते,जीवनातील प्रश्न असो, समाजातील प्रश्न असो, प्रश्नाचे निदान झाले तर उपाय करणे शक्य होते. पंरतु प्रश्नाचे निदान न करता समर्थन करणे व त्यासाठी उपलब्ध ज्ञानाचा वापर करणे ही प्रज्ञावादी भूमिका ठरते.   प्रज्ञावादात प्रश्नाला वाव नसतो.स्वतःला योग्य ठरविण्यासाठी प्रज्ञावादाचा वापर होतो.सार्थ भाष्य झाले तर स्वतःच्या उपयोगात येते व इतरांनाही त्याचा उपयोग होऊ शकतो. निरर्थक भाष्य अडथळाही होण्याचा संभव असतो. आपले उद्दीष्ट साध्य करण्यासाठी उपलब्ध ज्ञानाचा संदर्भ देतो ,याच आधारावर समाजात जाहीराती असतात. जे दुसऱ्याने करायचे त्यासाठी जाहीरात वापरतात. यामुळे उपलब्ध ज्ञानाला स्वतःच्या सोयीप्रमाणे व्यक्त करतात.

जशी दृष्टी असते. तसे दिसते. पैसाच शक्ती आहे ,सुख आहे या स्वमतांधतेमुळे **गरीब खाओ,भूंगडा तो भुखा मरो खावे अमीर खावे, तो शौकसू** अर्थात फूटाणे कोण खातो या दृष्टीनुसार प्रज्ञावाद बोलतो.

स्वतःला ज्ञानी दर्शविण्यासाठी शास्त्राचाही संदर्भ देतो.**अहंकार विमूढात्मा कर्ताहम् इति मन्यते** (३–२७)अर्थात ही ज्ञानी अवस्था नसून अहंकार बोलत असतो. समाजात निरर्थक वाद याच अज्ञानामुळे चालत असतात. प्रश्न,विषय यावर भाष्य होत असतांना विषय जाणून घेण्यासाठी ऐकत नसून उत्तर देण्यासाठी ऐकत असतात. प्रज्ञावादी संवयीमुळे प्रश्नाचे निदान होत नाही. प्रश्नाची पारदर्शकता नष्ट होते.जखम चिघळावी तसा प्रश्न चिघळत जातो व प्रश्नाचेच वृक्ष तयार होते. मुख्य प्रश्न बाजूला पडतो.मुख्य प्रश्नाची स्थिती भीक नको पण कुत्रा आवर अशी होते.

**समत्व दृष्टी :** समत्व ज्ञानी दृष्टीचा आधार असते .प्रज्ञावादाचा आधार द्वंद्व असते . जन्म व मृत्यू अधिकारात नाही पण जगणे अधिकारात आहे.गेलेला क्षण परत येत नाही वर्तमान क्षणच महत्वाचा आहे .वर्तमानच भविष्य घडवते .जगाविषयी चांगले वाईट ही विभागणी किंवा स्वतःच्या प्राप्तीसुखातील सुख दुःख ही द्वंद्वयुक्त विभागणी असते.समत्व दृष्टी नसते. यामुळे इतिहास किंवा पुरातनशास्त्राकडे पाहतांना स्वमतांधतमुळे त्यातील ज्ञान समर्थन किंवा टिका करणे यासाठी वापरतो .जगातील चांगलेपणात ज्ञान असते.समत्व दृष्टीमुळे जगावर दोषारोपण न करता त्यापासून ज्ञान प्राप्तीची दृष्टी धारण होते.यामुळे संसाधनाची उपयुक्तता जाणतो.वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यासाठी समत्वदृष्टीमुळेच पुरातन शास्त्राला नवीन आकार देता येतो. म्हणूनच सूज्ञ इतिहासापासून धडा घेतात.अर्जुनाने निश्क्रीयतेचे समर्थन करतांना धर्मातील पुरातन शास्त्राचा संदर्भ दिला. तर श्रीकृष्णाने वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यासाठी पुरातनशास्त्राला नवीन आकार दिला. यज्ञाची संकल्पना जीवनमार्गाच्या व्यवस्थापनात वापरली.

समत्वदृष्टीमुळे जीवनात, जगण्यात, जगाकडे पाहण्यात वैज्ञानिक दृष्टी येते. स्वतःतील न्यूनगंड नष्ट होतो व ज्ञानी अवस्था जीवनाची उच्चपातळी आहे याची जाणीव येते ही जीवनातील ज्ञानी दृष्टी सक्रीय होते व जीवन सुखाची साधना व विकासाची प्रक्रिया आहे याचे ज्ञान होते. वर्तमान क्षणाचा उपयोग करतो कार्यकौशल्याचे महत्व जाणतो ,विकास दृष्टी धारण करतो या प्रमाणे विकासचक्र प्रवर्तीत होते.

**वैज्ञानिक दृष्टी :** कोणताही व्यक्ती सुखासाठी कार्य करतो, दुःख प्राप्तीसाठी नव्हे. अर्जुनाची प्रज्ञावादी भूमिका अवैज्ञानिक होती कारण सत्य लपविले असते .अर्जुनाला कार्यात दुःखमुक्ती हवी होती. जगाच्या दुःखाविषयी तीव्र भावना असणाऱ्या भन्साळी महाराजाला प्रत्यक्ष सत्कार्यच उपाय गवसला. विकासदृष्टीचे ज्ञान नसेल तर केवळ भावना प्रज्ञावादाद्वारे व्यक्त करणे ही अवस्था अर्जुनाची झाली.कार्यरत होतांना योगासाठी कार्य ही भूमिका धारण होणे हीच जीवनाची ज्ञानी पातळी असते.याच परिमाणावर(माणक) श्रीकृष्णाने अर्जुनाच्या प्रश्नाचे निदान केले.व अज्ञान ठरविले.श्रीकृष्णाने याप्रमाणे समज दिली तेव्हा संभ्रम

कबूल केला. अर्जुनाच्या या प्रश्नात वैज्ञानिक दृष्टी आली. प्रश्नाचे निदान करणे व त्या प्रश्नाचे निराकरण करणे ही कार्यशाळा श्रीकृष्ण व अर्जुन यांचे संवादाद्वारे भगवदगीता ठरली.जीवनाची प्राकृतीक पातळी दुःखदायी आहे तर ज्ञानी पातळी सुखदायी आहे . निर्णय तुझा आहे असे ठामपणे श्रीकृष्णाने सांगीतले. अर्जुनाच्या प्रश्नाचे निराकरण झाल्यावर त्याने स्वतःचा निर्णय घेतला. स्वमतांधता व कार्यशाळा यातील फरक वैज्ञानिक दृष्टीमुळे स्पष्ट झाला.हीच वैज्ञानिक दृष्टी जीवन जगण्याची ज्ञानी दृष्टी ठरते.यामुळेच साध्य(ध्येय)ठरवून मार्ग ठरविणे ही योजक दृष्टी (व्यवस्थापन दृष्टी ) लाभते. विकासाचे व्यवस्थापन करण्यासाठी आध्यात्मिक व्यवस्थापनाची दृष्टी खालीलप्रमाणे लाभते.ही ज्ञानी दृष्टी असते.

**ब) व्यवस्थापनाची दृष्टी :**

**व्यवस्थापनाचा आधार : योजक दृष्टी**

**अमंत्रं अक्षरं नास्ति नास्ति मूलम अनौषधम्। अयोग्यं पुरूषं नास्ति योजकः तत्र दुर्लभः।**

जग संसाधनांचा खजीना आहे कोणताच व्यक्ती निरूपयोगी नाही योजक दृष्टीची योजकाची गरज असते.ईश्वराची ओळख सृष्टीचा अध्यक्ष म्हणून होते. ईश्वराची भूमिका योजकाची ठरते. **ओम तत् सत्** (गीता १७-२३) (अर्थात मानवकल्याणासाठी सृष्टीचे संचलनचक्र चालूआहे)हा संदेश सृष्टीचे व्यवस्थापन दर्शवतो.मनुष्य प्रवचन, कीर्तन यात रमतो. तेव्हा ईश्वरावर श्रध्दा सिद्ध होते.शाश्वत अमृत धर्माची ओळख झाली तर ईश्वर या वैश्विक शक्तीची ओळख सृष्टीचा संचालन करणारा अध्यक्ष अशी होते.

व्यवस्थापन तंत्रामुळे (*Mechanism to achieve Goal* )मोठमोठी संघटीत कार्ये संचालित होतात. या तंत्रातील योजक भूमिका संघटकाची असते. सृष्टीचे संचालन ईश्वर या वैश्वीक शक्तीला अध्यक्ष जाणून सुरु आहे ही संकल्पना मान्य केली तर मनुष्य आपल्या कार्याद्वारे सृष्टी संचलनात सक्रीय योगदान करतो. ही मान्यता आध्यात्मिक क्रांतीद्वारा व्यक्ती स्वीकारतो. दैवीगुणी (किंवा धार्मिक) व्यक्तीच्या देवतावरील श्रध्देचा उपयोग (अव्यक्त शक्ती) ईश्वर ज्ञानात परिवर्तीत होतो. प्राप्तीसुखासाठी कार्य हे कार्याचे निमित्त असून ज्ञान साधनेसाठी कार्यरत असणे ही दृष्टी स्वीकारतो. कार्यातील यज्ञभाव जीवनमार्गातील आध्यात्मिक व्यवस्थापनाची दृष्टी देते.इच्छा, भावना कार्यामध्ये (इंद्रियाग्नि) भस्म करणे व कार्य आत्मसंयम रूपी योगाग्नित भस्म करणे. या यज्ञातील ज्ञानरूपी अग्नि सर्वकार्याचे ज्ञानात रूपांतर करते. हे ज्ञानच शाश्वत सुख ठरते.

देशातील मनुष्य बळ विकासात अडथळा नसून सक्रीय असावा हाच शाश्वत व्यवस्थेचा आधार आहे.जपानमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर विकासाचा आलेख तयार करतांना ग्रामीण क्षेत्राला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ग्रामीण पुनर्निर्माण मंत्रालय स्थापन केले. ग्रामीण रोजगार शेतीव्यवसायावर अवलंबून

आहे. यात शेतमजुरांची संख्या अधिक होती. ग्रामीण क्षेत्रातील रोजगार सक्षम झाला तरच देशाच्या समग्र विकासात संपूर्ण मनुष्यबळ उपयोगात येईल. ही दृष्टी ठेऊन कृषी व उद्योग याचा समन्वय साधणारी ग्रामीण औद्योगिकरणाची आखणी केली. याद्वारा सन १९४८ ते १९८४ या कालखंडात कृषीवर आधारीत रोजगार असणाऱ्यापैकी ८० टक्के लोकांना अन्य व्यवसायात (उद्योग व सेवा) रोजगार संधी उपलब्ध करून दिली ग्रामीण सक्षमीकरणासाठी ही जापानची वैज्ञानिक दृष्टी ठरली. हीच वैज्ञानिक दृष्टी शाश्वत समाजव्यवस्था धारणेसाठी आवश्यक आहे.

१९व्या शतकातच अमेरिकेत कृषी उद्योगाच्या सहकारी संस्था अस्तीत्वात आल्या. कृषीमालाची उपलब्धता हंगामी असल्यामुळे व्यवस्थापनाचे ढांच्यातच बदल केला.कॅलीफोर्नियाची संत्रा उत्पादकांची सनकिस्ट एक्सचेंज नवीन आकारात यशस्वी ठरली.व्यवस्थापन तंत्र साधले.यशस्वी झाले तर तेच विशिष्ट कार्यासाठी व्यवस्थापनाचे शास्त्र बनते.व्यवस्थापनाचे योग्य तंत्र स्वीकारणे ही वैज्ञानिक दृष्टी ठरते.योजकाची दृष्टी असते.

## ४. विकास दृष्टी–आध्यात्मिक व्यवस्थापन(VISION of Developement/ Know Your Destiny & Path )

**(सृष्टी संचलन,समुहाचे संचालन व स्वतःची भुमिका)**

*Cherish your Visions and your dreams as they are the children of your soul,the blueprint of your ultimate achievement-Napoleon Hill*

### अ)सृष्टी संचलन ( Wheel of God ) :

**वासुदेवः सर्वम् इति (गीता७–१९) विश्व चांगले आहे . व स्वतःचा आदर करणे हा (आत्मैव हि आत्मनो बंधुः)** विश्वधर्माचा मनुष्याला संदेश आहे. या संदेशातूनच मनुष्य स्वतःची ओळख करतो.सॉक्रटीसने स्वतःला ओळखा हीच हाक दिली होती . तुझा जन्म सामान्य (प्राकृतिक) म्हणून जगण्यासाठी नसून ईश्वराच्या राज्यातील सुगंध जगामध्ये दरवळण्याची संधी तुला प्राप्त आहे. जगातील चांगलेपणा, प्रभाव, उर्जा (शक्ती), ऐश्वर्य याद्वारे ईश्वराचा सुगंध (विभूति)जगात दरळवत असतो. हा सुगंधच या विश्वात ईश्वराचे साकार रुप प्रकट करीत असतो. म्हणून जो सात्विक आहे, अर्थात दैवीगुणसंपन्न आहे .त्याला ईश्वराचे प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त आहे. हा विश्वास मिळतो.चांगल्या व्यक्तीची प्रेरणाच जणू ईश्वर प्रमाणित करते म्हणून जीवनाच्या ज्ञानी पातळीवर स्वतःचे कार्य ईश्वरानेच दिलेले आहे. अशी दृष्टी होऊन ईश्वराचे प्रतिनिधित्व साकार करीत असतो. सुखाचे संदर्भात सकारात्मक दृष्टी ,ज्ञानाचे संदर्भात समत्व दृष्टीद्वारा वैज्ञानिक दृष्टी लाभते.अडचणीचे कार्यसंधीत परिवर्तन होते.जीवनमार्गासाठी

कार्यकौशल्य विकसीत करण्याची प्रेरणा मिळते.

**ब) समुहाचे संचालन :**

**समुह व्यवस्थापनातील तत्वज्ञान :**व्यक्ती समुहात राहतो.समुहात कुटुंब,संस्था,देश,इत्यादिचा समावेश होतो. समुहातील प्रश्न समुहव्यवस्था सोडवीत असते.यासाठी समुहव्यवस्थापनाचे प्रयोजन असते.मधमाशी फुलातून पराग गोळा करते.फुलाचे बीज करते.सृष्टीला फुलवीत असते.याप्रमाणे सृष्टीत परस्परसहकार्य असते.समुहाच्या आकारानुसार व्यवस्थापनशास्त्र ठरविल्या जाते. समुहाला कार्य करण्यासाठी नियम बनविणे,कार्यप्रणाली ठरविणे, निर्णय घेणे यासाठी व्यक्ती वा समुहाला अधिकृत करणे.याचसाठी स्वत:चा अधिकार समुहाला प्रदान करणे . समुहातील प्रश्नाचे निदान करणे.प्रश्न सोडविण्यासाठी कार्यप्रणाली ठरविणे यावर होणारी चर्चा कार्यशाळा असते.ठरलेल्या निर्णयावर समुहाचा अध्यक्ष शिक्कामोर्तब करतो. व व्यक्ती स्वधर्म म्हणून निर्णय स्वीकारतो. निर्णय अधिकार स्वातंत्र्यमूल्य असते.स्वत:चा निर्णय अधिकार स्वधर्मात परिवतीत करणे ही समुहनिष्ठा असते व.समुहनिष्ठेसाठी स्वधर्म जीवनमूल्य ठरते. व्यक्ती स्वधर्म म्हणून निर्णय स्विकारतो व स्वतःचा मार्ग बनवतो.

समुहाचे व्यवस्थापनात(१) नियम,योजना बनविणे, व (२)योजना कायान्वित करणे याचा समावेश होतो.सामान्य पातळीवरील लोकांना तात्काळ सुखसुविधा, यासाठी रोजगार व याचसाठी योग्य समाजव्यवस्थेची आवश्यकता असते. तर ज्ञानी स्वतःचा मार्ग स्वतः बनवतो.मनुष्य जीवनाच्या सामान्य व ज्ञानी या दोन पातळीचा आधार राज्यकारभारात संचालनासाठी वापरलेला आढळतो.इंग्लंडमधील विद्वानांचे सभागृह व सामान्यांचे सभागृह(**Commanwealth**) किंवा मुगल राजवटीतील दिवान ए खास व दिवान ए आम किंवा लोकसभा–राज्यसभा यांत हाच आधार दिसतो.शांती ,सूरक्षा व सृष्टीतील फळांचा लाभ होणे या सामूहिक फायद्यासाठी आपला अधिकार व्यक्ती किंवा व्यक्तीच्या समुहाला देणे यातून यूरोपात कॉमनवेल्थचा (**Commanwealth**)उदय झाला.

**समुह व्यवस्थापनात धर्माची भुमिका :** भारतीय पुरातनशास्त्रात श्रीगणेश गणनायक प्रतिक आहे. रिद्धी व सिद्धी श्रीगणेशाच्या पत्नी यातील रिद्धी म्हणजे नियम, योजना बनविणारी व सिध्दी म्हणजे कार्य सिद्ध करणारी असते.

**वक्रतूंड महाकाय सूर्यकोटी समप्रभः**
**निर्विघ्नं कुरुमे देव सर्व कार्येषु सर्वदा**

असे योग्य महामानवाचे वर्णन ठरते.महात्मा स्वतःच आपल्या मार्गावर राहून कार्यरत असतो व कार्याचाच आदर्श जगात ठेवतो. आपल्या कार्यामुळेच असे महापुरूष जगात महामानव ठरतात व समाजाला नवीन आयाम देतात..श्रीगणेश ही महामानवांची देवता ठरते.त्यांचा मार्ग वेगळा म्हणजे वक्र असतो. म्हणून वक्रतूंड ठरतो. सर्व कायांना (शरीरांना) आपल्या निर्मित मार्गावर वळवतो म्हणून महाकाय ठरतो. सूर्य

पृथ्वीला प्रकाशित करतो म्हणून डोळे पाहू शकतात. अशा कोटी सूर्यांच्या प्रकाशासमान ज्ञानप्रकाश बुद्धीला देऊन दृष्टी देतो व यामुळेच व्यक्तिचे कार्यातील बाह्यविघ्न अर्थात योगक्षेमफलातील अपयश, शोषण तसेच द्वंदरुपी आंतर्विघ्न दूर होऊन स्वधर्माचरणास समर्थ होतो.स्थिर ,सकारात्मक विचाराने संस्कारीत होऊन स्थिरत्व लाभते . म्हणून सृतिधर्मयुक्त अनेक धर्म या भूतलावर आलेत.

**शाश्वत धर्माची भुमिका** : व्यक्ती,समुह व सृष्टी यातील परस्पर सहकार्य हा धर्माचा आधार असतो . धर्माने चुकीचा समाजव्यवस्थेचा ढांचा (मॉडेल) प्रस्थापित केला म्हणून मार्क्सने धर्माला अफूची गोळी म्हटले. यामुळे धर्म व समाजव्यवस्था वेगळी केली ही वैज्ञानिक उपलब्धी ठरली. देशाचे विकासासाठी योग्य समाजव्यवस्था कारण आहे ही दृष्टी जगासमोर आली.गीतेत सृष्टीचे विज्ञान सांगून मनुष्याची भूमिका सक्षम करण्यासाठी धर्म सांगीतला तो शाश्वत धर्म ठरतो. समाजात शोषण, संभ्रम वाढणे याला श्रीकृष्णाने धर्मग्लानी संबोधले धर्मस्थापने साठी शाश्वत धर्माचे शास्त्र सांगीतले.समाजातील शोषण बाह्यविघ्न असते म्हणून समाजव्यवस्थेचा योग्य ढांचा समृद्धीसाठी आवश्यक ठरतो.शाश्वत धर्म मनुष्यजीवनातील स्वातंत्र्याचे ज्ञान स्पष्ट करते.मनुष्याला व्यक्तिगत जीवनात निर्णय घ्यावा लागतो. व त्याला पक्का करण्यासाठी स्वतःच शिक्कामोर्तब करावे लागते. शिक्कामोर्तब करण्यासाठी धर्म वापरतो.शाश्वत धर्मातील जीवनमुल्ये व कार्य याद्वारा प्रकृतिधर्म विकसित होतो.जीवनमार्गातील संभ्रम आंतर्विघ्न असते . दैवी (चांगल्या) व्यक्तीला दुर्बलता शोभित नाही . म्हणून जीवनविकासात जीवनमूल्यांचा वापर ही वैज्ञानिक दृष्टी असते. या दृष्टीमुळेच मनुष्याला कार्यक्षमता विकसित करण्याची दृष्टी प्राप्त होते.

**क) कार्यकौशल्य :( कार्याकडे पाहण्याची दृष्टी)–**

गोष्ट–अमेरिकेतील एक कारखानदार जवळच्या देशातून मजुर बोलवीत होता. एक महिन्याच्या मजुरीत मजुराचा वर्षभर चरितार्थ भागत होता. एक महिना काम केले की मजुर स्वदेशाला परत जायचे व मजुराअभावी कारखाना बंद पडत होता.कारखानदाराने युक्ती केली.जवळच दारू व जुगाराचे दुकान थाटले.परिणामी वर्षभर कारखाना सुरळीत चालला .कार्यकौशल्याचे अज्ञान समाजात चुकीचे संदेश देत असतात.श्रीमंती आहे म्हणून पिढ्या बसून खातील अशा संदेशामुळे निष्क्रीय पिढी तयार होणे विकासदृष्टीचे अज्ञान दर्शविते.तर सुरवातीला एखादे लहान कार्य करणारा पूढे मोठा उद्योगपती होतो .यावरून त्याला विकासदृष्टी होती हे सिध्द होते.कार्यकौशल्याच्या अज्ञानामुळेच जगात शोषण असते.

जगात लोक आपल्या प्रकृतीधर्मानुसार कार्यरत असतात. कुणी प्रचंड कार्य करूनही शांत असतो तर कुणाला स्वतःच्या योगक्षेमासाठी कार्य करण्याचेही कष्ट होते. हा कार्यकौशल्याचा फरक असतो. जीवनविकासात प्रत्यक्ष कार्याद्वारे विकास होत असतो.कार्यकौशल्य साध्य करणे ही विकासदृष्टी ठरते .मनुष्याचे सहजकार्य व गुण (जीवनमूल्य) याद्वारा कार्यकौशल्य विकसीत होत असते. कार्यकौशल्य

कार्याकडे पाहण्याची दृष्टी विकसीत करते. कार्याकडे पाहण्याची दृष्टीच मनुष्याची पातळी ठरविते .प्राकृतिक पातळीवर व्यावहारिक प्राप्तीसाठी कार्य तर कार्याद्वारे ज्ञानसाधना होण्यासाठी ज्ञानी होणे ही कार्यकौशल्य साध्य करण्याची विकासदृष्टी असते. कार्यकौशल्य विकसीत करण्यासाठी जीवनमूल्यांचे महत्व जाणणे आवश्यक असते.

**सृति व जीवनमूल्ये भेद :** स्वतःला स्वतंत्र करण्यासाठीच स्वतंत्र मार्गाचे ज्ञान व स्वतंत्र मार्गासाठी जीवन मूल्यांचे महत्व कळणे आवश्यक आहे. काळ जसा जसा पुढे सरकतो, वर्तमानात बदल घडत असतो. भूतकाळातील जीवनविषयक जगाविषयक संकल्पनाही बदलत असतात. परंतु मनुष्याचा वर्तमानातील निर्णय अधिकार या संकल्पनेत बदल होत नाही. जीवनविषयक शाश्वत मूल्यांमध्ये बदल होत नाही.अध्यात्मज्ञान,शाश्वत जीवनमूल्ये जगातील सर्व मानवांना सारखेच लागू पडते. म्हणूनच श्रीकृष्णाने वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यासाठी अर्जुनाला निर्णय पक्का करता यावा यासाठी शाश्वत मूल्य अधिष्ठीत शाश्वतधर्म सांगीतला .

शाश्वत धर्मातील जीवनमूल्ये स्वतःचा मार्ग बनविण्यासाठी ,चालण्यासाठी, साधनेसाठी असतात. सृति व जीवनमूल्ये यातील भेद आध्यात्मिक क्रांती मुळेच स्पष्ट होतो.शाश्वत जीवनमूल्ये जगतमान्य असतात मनुष्याची भूमिका सक्षम करण्यासाठी आवश्यक असतात. जीवनमूल्यांचे महत्व नीट कळले नाही तर अर्थाचे अनर्थ करून चुकीचे संदेश समाजात जातात. समाजात व्यवहार असतो. व्यवहारात समर्थन ,उपदेश जाहीराती चालू असतात. याद्वारा जीवनमूल्याचेही आपल्या सोयीने अर्थ लावून समाजात संदेश पोहोचतो म्हणून अपभ्रंश होतो. रामायणात वचन मूल्य दर्शविले .वचन स्वतःला मार्ग पक्का करण्यासाठी जीवनमूल्य ठरते यात पितृआज्ञा या संस्काराचाही उल्लेख आहे. परंतु कोणतेही सत्संस्कार आचरण करतांना जेव्हा स्वतः स्वधर्माचे शिक्कामोर्तब करतो तेव्हाच स्वतःचा मार्ग पक्का होतो. म्हणून स्वावलंबन, वचन स्वधर्म ,कर्मयोग शाश्वत धर्मातील जीवन मूल्ये ठरतात.जीवनमूल्ये वापरण्यामुळे प्राकृतिक पातळीवरील व्यावहारीक कार्य योगसाधनेचे साधन बनते. जीवनमार्ग पक्का होतो.

## विकास

### ५) विकास भुमिका : (Leadership / Honour yourself )

*Everyone thinks of changing the world,but no one thinks of changing himself.-Leo Tolstoy*

*‘BE the CHANGE that you wish to see in the world.”*

मनुष्य जीवनात एखाद्या चांगल्या कार्याचे स्वप्न पाहतो. हे स्वप्न प्रेरणा देते. प्रेरणा प्रत्यक्ष कार्याद्वारे साकार करण्यासाठी जी धारणा शक्ती वापरल्या जाते ती सात्विक धृति असते.जीवनमार्गातील, जीवनातील विश्वास आध्यात्मिक क्रांतीद्वारा व्यक्ती प्राप्त करू शकतो. हा विश्वास धारणाशक्तीला (साहस) सक्रीय करीत असतो.जे कार्य आपण चांगले करू शकतो त्या कार्याचा स्वतःला आत्मविश्वास असतो.त्याच कार्याचा व्यवहारात उपयुक्त कार्यासाठी उपयोग करणे,यासाठी आध्यात्मिक व्यवस्थापनाचे महत्व आहे.ध्येय ठरविणे,कार्यकौशल्य साध्य करणे हा व्यवस्थापनाचा भाग असतो.ध्येय पक्के ठरले तर मार्गाचे नियोजन करतो.हजारो मैलाचा प्रवास करण्यासाठी प्रथम पाऊल आवश्यक असते.या मार्गात ईश्वर ज्ञान विश्वास वृद्धीगत करण्याचे ज्ञान ठरते.स्वतःची भुमिका जाणणे व सक्षम करणे हीच विकास भुमिका असते.

**नायक भुमिका : न हि मानुषात श्रेष्ठतरं ही किंचीत.**

या भूतलावर मनुष्यजन्म श्रेष्ठ आहे व मनुष्याला त्याचा वर्तमानातील क्षण अती महत्वाचा असतो. जीवनाचे आव्हान स्वीकारणे म्हणजेच जीवन विकासाचे दायित्व स्वीकारणे.मनुष्य आपल्या संस्कारानूसार जीवनमार्ग चालत असतो पण त्याने जी जगण्याची भूमिका घेतली असते ती त्याचीच निवड असते.म्हणून आपण या जगात जगतांना बघ्याची भूमिका जगत आहो कि नायक भूमिका जगत आहो याची ओळख स्वतःला होणे आवश्यक असते. मनुष्य जोवर जीवंत असतो तोवर त्याचा जगाशी संबंध असतो.मनुष्य असो वा नसो सृष्टीची यात्रा सुरूच राहणार. स्वतःची भूमिका जाणून घेतली तर आपण सृष्टीच्या रंगमंचावर नायक भूमिका वठवू शकतो अन्यथा प्रेक्षक म्हणून जगण्याचीच भूमिका असते .

जीवनातील संभ्रमामुळे जेंव्हा प्रज्ञावाद बोलून मनोरंजन करतो चांगले वाईट अशी विभागणी करून जगाकडे पाहतो तेंव्हा प्रज्ञावादी अवस्था बघ्याची भूमिका ठरते.मनोरंजन म्हणून जगाचा तमाशा पाहण्यासाठी मनुष्यजन्म नाही यामुळे स्वतःची भूमिका मात्र बघ्याची होते .जगावर कितीही भाष्य केले कितीही क्रियाप्रतिक्रीया व्यक्त केल्या तरी जगाला काहीही फरक पडत नाही जग सुधारत नाही म्हणून स्वतःचा स्वतःच त्रागा करून घेतो ही बघ्याची भूमिका स्वतःलाच अडथळयाची ठरते .प्राणीही जगतात,मग स्वतःच्या जगण्यात वैशिष्टय काय?

**मै चला था अकेला मंजिल की ओर, लोग आते गये कारवॉ बन गया.**जीवनाच्या प्रेक्षक भुमिकेची ओळख झाली तेव्हाच नायक भुमिकेचे महत्व जाणतो. जेव्हा लोक ' मीच का ?' हा प्रश्न करतात,तर जे विकास करतात ते 'मीच का ?'हा प्रश्न करीत नाही. स्वामी विवेकानंदानी भारतीय नवयुवापिढीकडून हीच अपेक्षा केली होती . विकासभुमिका घेण्यासाठीच आध्यात्मिक क्रांतीचा संदेश दिला. नायक किंवा पुढारी ही संज्ञा केवळ सिनेमातील नायक किंवा राजकीय क्षेत्रातील पुढारी नसून या सृष्टीच्या रंगमंचावरील नायक असतो .स्वतःच्या कार्यक्षेत्राचा तोच पुढारी असतो.

**स्वतःचा आदर :** स्वतःतील दिव्यत्वाचा विश्वास सक्षम व्यक्तीमत्वाचा आधार असतो. चांगल्या (दैवीगुणी) व्यक्तीला दुर्बलता शोभत नाही हा गीतेने संदेश दिला. विश्वास व आंतरिक अनुभूति हाच अध्यात्म ज्ञानाचा आधार असतो. आत्मविश्वास असणे व्यक्तीची शक्ती असते. आध्यात्मिक क्रांतीद्वारा सात्वीक होणे म्हणजेच प्रचंड आत्मविश्वास असणे. सत् (चांगल्या) व्यक्तीची प्रेरणा प्रमाण हा विश्वास स्वतःला मिळतो.वर्तमानात प्राप्त परिस्थितीत जीवनाचे आव्हान स्वीकारण्यासाठी स्वतःला दुबळे न करता स्वतःची शक्ती अनुभवणे आवश्यक असते.अशक्य शब्द माझ्या शब्दकोशात नाही हे ब्रीदवाक्य वापरून नेपोलियन बोनापार्ट स्वतःला गती देत असे. बुद्धीला सकारात्मक ज्ञानाने संस्कारीत करुन कार्यक्षेत्रात शक्तीचा संचार होण्यासाठीच आध्यात्मिक गती (**Charging the Mindset**)प्राप्त करण्याचे ज्ञान भगवद्गीतेव्दारा उपलब्ध झाले.

मनुष्याने ठरविले तर नराचा नारायण होईल. यासाठी स्वतःचे स्वतःवर नियंत्रण हवे असते.

**उध्दरेत आत्मना आत्मानम् न आत्मानम् अवसादयेत ।**

**आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुः आत्मनः** (गीता ६-५) अर्थात विकासाचे दायित्व स्वीकारणे हा स्वतःच्या जीवनाचा आदर ठरतो. स्वतःच स्वतःचा मित्र बंधू होतो , आत्मवश असतो.तो विकासभूमिकेत असतो,जो विकासभूमिकेत नसतो तो स्वतःच स्वतःचा शत्रू ठरतो, ही विकास पुरूषाची भूमिका स्पष्ट करतांना शरीराला नावेची उपमा दिली आहे .प्रत्येक व्यक्तीच काय प्राणीमात्र सुध्दा मृत्युपर्यत जगतच असतात.वाघ, बकरी, गाय, साप इत्यादी प्राणी जीवीत असेस्तोवर प्राप्त स्वभावानुसार जगत असतो.परंतु समुद्रातील नाव वाऱ्याने वाहणे व नाव वल्हवणे हाच जगण्याच्या भुमिकेतील फरक असतो. जो स्वतःचा आदर करतो तो नाव वल्हवीत असतो अर्थात त्याचे स्वतःवर नियंत्रण असते. वाहनावर नियंत्रण करता आले तरच कोणतेही वाहन आत्मविश्वासाने चालवतो. नियंत्रण नसल्यामुळे ज्याची नाव वहात असते तो स्वतःचा अनादर करतो .या दोन अवस्था अनुक्रमे आत्मवश व मनोवश ठरतात.

*गोष्ट– एक गृहस्थ पिंजऱ्यात पोपट पाळतो. पोपटाची त्याला दया येते व तो त्याला मुक्त करून म्हणतो, तू आता स्वतंत्र आहेस. अनेक दिवस पिंजऱ्यात राहिल्यामुळे पोपटाला उडाण करणे कष्ट वाटते तेंव्हा तो पिंजऱ्यातच राहणे पसंत करतो. तो आपल्या मालकावर प्रेम व्यक्त करून म्हणतो, तुमच्याजवळ राहणे हेच माझे स्वातंत्र्य आहे. काही दिवसानंतर मालकाला म्हणतो. माझ्या खाण्यापिण्याची चांगली व्यवस्था कर मालक व्यवस्था करतो, पोपटाच्या मागण्या वाढत जाते. ताज्या फळांची व्यवस्था कर अन्यथा मी क्रांती करेल असा मालकाला इशारा देतो याप्रमाणे पोपट नेहमी त्रागा करीत असतो व एक दिवस पिंजऱ्यात मरून पडतो.*

पक्षी पिलाला उडाण करतांना साहाय्य करतात. मनुष्य प्रेमापोटी पिंजऱ्यात पाळतो, त्याची खायची व्यवस्था करून प्रेम व्यक्त करतो. परंतु हेच प्रेम पोपटासाठी बंधन ठरते व तेच प्रेम पोपटाच्या स्वैरवृत्तीस कारण ठरते. सुखासाठी प्रेम व स्वातंत्र्य यातून स्वातंत्र्याची म्हणूनच निवड होते.स्वातंत्र्याचा संबंध

अधिकाराशी असतो.तर प्रेमाचा संबंध –आधार परावलंबन याचेशी असतो. परावलंबन झुगारून स्वावलंबन या जीवनमूल्याने क्रांती घडली असती.उडान करण्यासाठी पोपटाला जी क्रांती (परिवर्तन) हवी होती तीच आध्यात्मिक क्रांती ठरली असती. उडान पक्षाच्या मुक्तीचे साधन ठरते तद्वत जीवनमार्गात कार्य व निर्णय अधिकार मनुष्याच्या स्वातंत्र्याचे साधन ठरते,

**शाश्वत जीवनमूल्यांची धारणा :**

स्वतःचा आदर करणे याचा अर्थ स्वतःचे श्रेष्ठत्व दर्शविण्यासाठी व इतरांचा द्वेष करणे ,अहंकार नव्हें.दुर्बलता सक्षमतेने प्रतिस्थापित करणे.यासाठी शाश्वत जीवनमूल्याचा वापर करणे.स्वावलंबनामुळे निर्णय अधिकार मिळतो.**Beggars are not choosers** या संदेशाद्वारा या मूल्याचे महत्त्व कळते.महात्मा गांधीनी स्वावलंबन या तत्वालाच केन्द्रबिन्दू करून विकासाची दृष्टी दिली होती. वचन या मूल्यामुळे कार्याचा निश्चय पक्का करू शकतो तर वचनमूल्य जपणाऱ्या व्यक्तीवर समाजाला विश्वास असतो. रामायणात वचन या मूल्यांचे महत्वच जगाला कळण्यासाठी **प्राण जाई पर वचन न जाई** या संदेशाद्वारा स्पष्ट केले. प्राकृतिक पातळीवर कार्यात संभ्रम द्वंद्वामुळे होतो म्हणून स्वधर्म जीवनमूल्य ठरते. कार्य स्वधर्मात परिवर्तीत होते. तसेच कार्याचा निश्चय पक्का होण्यासाठी कर्मयोग जीवनमूल्य ठरते.

**स्वावलंबन** स्वातंत्र्याच्या संस्कृतीचे पायाभूत जीवनमुल्य ठरते.निर्णय अधिकाराचा आदर ठरते.

**वचन** स्वतःच्या शब्दाचा आदर ठरते.

**स्वधर्म** –स्वधर्माचे शिक्कामोर्तब स्वतःच्या मार्गाचा आदर ठरते.

## ६) विकास मार्ग – स्वतःचे शिक्कामोर्तब हेच स्वातंत्र्य (Right of Governing Self)

*A man cannot be comfortable without his own approval-Mark Twain*

**स्वातंत्र्य ( मोक्षाकांक्षी भुमिकेचे रहस्य ) :** स्वातंत्र्य मनुष्याची स्वाभाविक प्रेरणा असते. म्हणून व्यवहारात स्वातंत्र्य मनुष्याला आवडते.मुक्ती सुखाचे रहस्य आहे. हे रहस्य जाणण्यासाठी दुःखास कारण ठरणाऱ्या स्वैरता, बंधन याची ओळख आवश्यक ठरते. मनुष्य प्रकृतिबध्द असतो व त्याचा सामना जीवनातील बंधनाशी असतो.जीवनात जगत असतांना बंधन वेगवेगळ्या प्रकारे डोकावत असते.याच बंधनाला आपण गुलामी अशीही संज्ञा देतो.गुलामी आवडत नाही म्हणून स्वातंत्र्य सुखासाठी स्वाभाविक प्रेरणा असते दुःख मार्गातील संभ्रम ,जीवनातील हार, अस्थिरता ,नकारात्मकता विचार. थोडक्यात जीवनातील नकारात्मक भाव बंधनामुळेच असते.म्हणून अर्जुनाला याच बंधनाची ओळख श्रीकृष्णाने करून दिली . जीवनमार्गात संभ्रम झाला असता प्रज्ञावाद बोलून आपली भूमिका योग्य आहे ही कलाटणी देऊन समाधान घेतो.अर्जुन बंधनात सापडला होता.त्याला बंधनाची ओळख झाली तेंव्हाच बंधन सोडविण्यासाठी

मुक्तीचे ज्ञान सांगितले व मोक्षाकांक्षी या भूमिकेचे रहस्य सांगीतले.या बंधनातून मुक्तीसाठी शाश्वत धर्माची उपयुक्तता गीतेत स्पष्ट केली.

**स्वातंत्र्याची संस्कृती :**स्वतःचा मार्ग स्वतःच चालणे हे साधे जीवन विकासाचे रहस्य आहे. हे रहस्य जाणणारा स्वतः स्वातंत्र्य अनुभवतो. स्वातंत्र्याच्या संस्कृतिला प्रोत्साहीत करतो. यामुळे कार्याच्या अधिष्ठानाचे. वर्तमानाचे महत्व जाणतो. परस्परसहकार्यासाठी हीच संस्कृती पोषक ठरते.यामुळे भाष्याची सार्थकता कळते. श्रीकृष्णाने याच संस्कृतिचा भगवद्गीतेत वापर केला. अर्जुनाला त्याच्या प्रश्नाचे फक्त स्पष्टीकरण दिले व निर्णय तूझा अधिकार आहे हे आवर्जून सांगितले.तो लादलेला उपदेश नव्हता. बंधनात टाकण्यासाठी उपदेश नव्हता तर मुक्तीचे ज्ञान होते.स्वतःच्या मार्गाची जाण यावी ,आत्मविश्वास यावा,हा स्वतःमधील सकारात्मक बदल असतो. यासाठीच आध्यात्मिक क्रांतीचे प्रयोजन आहे. सॉक्रेटीस म्हणतो ,मनुष्य बुद्धिमान आहे. त्याच्या विचारशक्तीला चालना मिळावी म्हणून मी उपदेश करणार नाही स्वतःला ओळखा हाच माझा संदेश आहे.दुसऱ्याने काय करावे यासाठी धर्माचे शिक्कामोर्तब करून उपदेश करणे याला व्यावहारिक धर्म म्हणता येईल. जेथे स्वातंत्र्याची संस्कृती नसते तेथे उपदेश करणारे जणू निर्णयच लादत असतात. तुझ्या भल्याचे सांगतो अशी हितचिंतकाची भूमिका घेऊन उपदेश देत असतात हे निर्णय अधिकारावर अतिक्रमण असते.

**अहं त्वां सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि मा शुचः** .(१८-६६) श्रीकृष्ण उपदेशकाची भूमिका घेतात तेंव्हा परिणाम जवाबदारी स्वतः स्वीकारण्याचे आश्वासन देतात. येथे ईश्वरज्ञान विश्वासाचे साधन ठरते व निर्णय मात्र स्वतःचा असतो.स्वभावनियत (प्रकृतिबद्ध) कार्यमार्ग चालू असतो. त्याचा प्रवास बंधन अवस्थेतच असावा किंवा मुक्त अवस्थेत व्हावा याचा निर्णय मात्र स्वतःचा असतो.

**स्वतःचा मार्ग शिक्कामोर्तब करणे** : स्वातंत्र्याचा पायाच निर्णय अधिकारात असतो.मनुष्याच्या व्यक्तिगत जीवनात, समूहात निर्णय प्रक्रिया महत्वाची असते. निर्णयक्षमता या संदर्भात निर्णयअधिकार, निर्णय ठरविणे, परिणामाची जवाबदारी स्वतः स्वीकारणे याचा समावेश असतो. जीवनातील स्वावलंबन मूल्यामुळे अधिकार मिळतो.निर्णय प्रक्रीयेचे ज्ञान नसते त्याचे अप्रत्यक्षपणे निर्णय होत असतात. प्रत्यक्षात तो जे करतो तो त्याचाच निर्णय असतो पण याचेच ज्ञान त्याला नसते.मी माझ्या कर्तृत्वाला स्वतः जवाबदार आहे. ही जाणीव वाल्या डाकूला (रामायण) झाली तेव्हा त्याला निर्णयाची ओळख झाली.समूहात निर्णय घेताना समूहाचा अध्यक्ष त्यावर शिक्कामोर्तब करतो. व व्यक्ती स्वधर्म म्हणून निर्णय स्वीकारतो.बंधनमुक्तीसाठी स्वधर्म जीवनमुल्य (Tiebreaker)असते,तर कर्मयोग स्वभावनियत मार्गाला मुक्तीमार्गात बदलवते. प्राकृतिक पातळीवरील जो कार्य मार्ग चालू असतो त्याला स्वतःचा स्वतंत्र मार्ग करण्यासाठी शाश्वत धर्माचे **शिक्कामोर्तब** करून निर्णय कर्मयोगात व स्वभावनियत कार्य स्वधर्मात परिवर्तीत करतो. स्वातंत्र्याचे ,ज्ञानी भूमिकेचे हेच रहस्य आहे. हे परिवर्तन आध्यात्मिक क्रांती असते.

## ७) सुखाची साधना (DEVOTION)

Curage may be the most important virtue because without it you may won't have the strength to sustain any other value"- Maya Angelou

सिकंदराने आपल्या कर्तृत्वाने जग जिंकले. परंतु जीवनाच्या उत्तरार्धात सुखासाठी भटकत होता.त्याला जीवनविकासातील वरची पायरी दिसली नाही.अंगुलीमाल डाकूने सिध्दार्थ गौतम बुध्दांना स्थीर हो म्हणून आदेश दिला तेंव्हा बुद्ध म्हणतात मी स्थीर आहो तू अस्थिर कां? अंगुलीमालला आपल्या दुःखाची ओळख झाली.

मनुष्य जीवनच सुखाचा प्रवास असतो. मनुष्यजन्म प्रकृतिबध्द असल्यामुळे योग्य अयोग्य हे द्वंद्व मोहाद्वारे बंधनाचे जाळे विणत असतो. प्रकृतिबद्ध जीव मृत्युपर्यत याच अवस्थेत जगत असतात.जीवनप्रवासात वरची पायरी सापडली की खालची पायरी आपोआप सुटते.म्हणून द्वंद्वमोहमुक्तीसाठी शाश्वत धर्माच्या प्रयोजनामुळे कार्यच मुक्तीचे साधन बनते.सुखासाठीच मनुष्य कार्यरत असतो तर याच कार्याद्वारे योगसाधना करणे व याद्वारे कार्य सुखाची साधना करण्याचे साधन करणे हे कार्यकौशल्य असते.हे शाश्वत सुखाचे रहस्य आहे.जीवनमूल्ये वापरून कार्यकौशल्य साध्य करणे हे सुखाचे रहस्य ठरते.

**जगण्यातुन योगसाधना–स्थितप्रज्ञ** :

दुःख, चिंता, निराशा, क्रोध बुद्धीला अस्थिर करते. म्हणून दुबळी अवस्था ठरते.जीवनविकासात सुखाची दृष्टी तम(मोह–नकारात्मक).रज(प्रवृत्ती –कार्यरत).सत(ज्ञान–प्रकाश–स्थीर बुद्धी)याप्रमाणे बदलत असते.जीवनाची सक्षम अवस्था म्हणजे बुद्धी समुद्रासमान स्थीर असणे. समुद्राला नद्या येऊन मिळतात पण समुद्र स्थीर असतो. दुर्बलतेवर मात करण्यासाठी सक्षम होण्याची साधना म्हणजे जीवनमार्गातील कार्याद्वारे योगसाधना (भक्ती)करणे.या ज्ञानामुळे जीवनमार्ग मानसिक व्यायामाचा (योग) मार्ग बनतो.कार्य सुखाची साधना करण्याचे साधन आहे याचे ज्ञान होते.बंधनमुक्ती साठी (Tiebreaker)स्वधर्म व कर्मयोग जीवन मूल्य ठरते.कार्यासाठी स्वधर्म ,व निर्णयासाठी कर्मयोग जीवन मूल्य असते.हीच अनूक्रमे सांख्यनिष्ठा व योगनिष्ठा असते. स्वभावनियत कार्य स्वधर्माद्वारे ज्ञानाचे साधन बनते तर निर्णय कर्मयोगाद्वारे योगाचे साधन बनते. याप्रमाणे कार्याद्वारे सुखाची साधना घडत असते.

**सार :**

समुहविकासाचे संचलनचक्र ,व्यक्तीविकासाचे संचलनचक्र सृष्टी संचलनातील प्रवर्तनचक्राचाच अविभाज्य भाग असतो.सृष्टीचे प्रवर्तनचक्र ईश्वरसंचालीत (Wheel Of GOD) आहे,याचे ज्ञान बुद्धियोग प्रदान करते.प्रत्यक्ष विश्वरूप पाहण्यासाठी अर्जुनाला दृष्टी दिली त्याला दिव्य दृष्टी म्हटले,सुखासाठी ईश्वरचिंतन(सृष्टीचे संचलनातील प्रवर्तनचक्र,संचलनातील प्रभाव ईश्वर विभूति जाणून) करणे,यात

रमणे,समाधान मिळणे यामुळे ंबुद्धियोग मिळतो.ंबुद्धियोग जगाकडे,महामानवाकडे, ज्ञानाकडे, स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलवते.

जीवनप्रवासाची दृष्टी कर्म या संदर्भात ं**असतो मा सत गमय** भक्ती या संदर्भात **मृत्योर्मा अमृतंगमय** व ज्ञान या संदर्भात **तमसो मा ज्योतिर्गमय** अशी असते.हा **अमृत**प्रवास ठरतो.बुद्धियोग संचलनचक्राला विकासचक्रात परिवर्तित करते.व्यक्तीच्या जीवनाचे संचलनचक्र सृष्टीच्या संचलनचक्राला ( प्रवर्तनचक्र)सहकार्य करते,ते विकासचक्र ठरते.विकासचक्र प्रवर्तन ही आध्यात्मिक क्रांती ठरते.विकासचक्र आध्यात्मिक व्यवस्थापनाचा आधार ठरते.यामुळे विकास दृष्टी मिळते.आध्यात्मिक व्यवस्थापनाचा उपयोग व्यक्तीविकास,समुहविकास यासाठी होतो.

# ३

# जीवनाचे आध्यात्मिक व्यवस्थापन

१**) जीवनाचे विकासचक्र प्रवर्तन : (Walk with GOD )**

**२)जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन:**

**स्वतःच्या मार्गाची पारदर्शकता :**

Vision without action is merely a dream.Action without vison just passes the time.Vision with action can change the world.- Joel A Barker

मनुष्याला दिव्य प्रेरणा स्फुरतात,या प्रेरणा साकार करण्यासाठी तो ध्येय ठरवितो व ध्येय सिध्दीसाठी कार्य करतो.याप्रमाणे जीवन जगण्याचा मार्ग ठरवीत असतो.हा मार्ग म्हणजेच कार्याचे व्यवस्थापन असते.मार्ग ठरविणे हा व्यक्तीचा अधिकार असतो हे व्यक्तिगत स्वातंत्र्य असते.व मार्ग ठरविण्यासाठीच कार्याचे व्यवस्थापन असते.मनुष्याचे शरीर अशाश्वत ( मर्यादित काळ)असले तरी मनुष्याचा जीवनप्रवास हा सुखासाठीच असतो.जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आपापल्या क्षमतेनुसार,ज्ञानानुसार,आवडीनुसार,व्यवस्थापनानुसार जीवनाचा मार्ग चालत असतो.

मनुष्याला प्रसन्न्ता हवी,सुख हवे. परंतु ते मिळविण्याच्या प्रयत्नात तो भ्रमाच्या जाळयात सापडला तर दुःखच वाटयाला येते .जीवनात जगत असतांना कळत नकळत भ्रम होतो; जसा मृगजळाला पाणी समजून वाळवंटात भ्रमच होतो.या भ्रमामुळेच जीवनात मनुष्याची फसगत होते.(जगापासून)चुकीच्या इच्छा अपेक्षा त्याच्या विश्वासाचा भंग होण्याचे कारण ठरते व तो दुःखी होतो.सुखासाठी जीवनाच्या प्राकृतिक (सामान्य)पातळीवर प्राप्तीवादी दृष्टी असते व या दृष्टीतूनच मनुष्य स्वतःची ओळख करतो. स्वतःचे दैव मापतो जगाने मला काय दिले हा विचार याच दृष्टीमुळे येतो व मनुष्याला व्यथित करण्यास कारण ठरतो.जीवन जगण्यातील भ्रम म्हणजेच अज्ञान असते.अज्ञानामुळेच सत्य झाकल्या जाते.या भ्रमातून मुक्तीसाठी अर्थात अज्ञान दूर करण्यासाठी अध्यात्मज्ञानाचे प्रयोजन होते.

व्यक्तिमत्त्व विकासात आध्यात्मिक क्रांतीचा उपयोग करून कार्यासाठी स्वतः पुढाकार घेणे .कार्याचे व्यवस्थापन करणे शक्य होते.विश्वास व आंतरिक अनुभूती हाच अध्यात्मज्ञानाचा आधार असतो.जीवनमार्गातील संभ्रम बंधन असते व विश्वास मुक्तीची किल्ली असते.विश्वासामुळेच स्वतःची प्रेरणा प्रत्यक्षात साकार करणे शक्य होते.म्हणून जीवनात स्वातंत्र्य व विश्वास अनुभवण्यासाठी व शक्तीच्या साधनेसाठी विश्वधर्माचा वापर करून जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन स्पष्ट होते.विश्वधर्माचा वापर विकासचक्र प्रवर्तित करते.

जीवनात ईश्वरज्ञानाचा आश्रय होण्यासाठी मोक्षकांक्षी ही जीवन मार्गाची दृष्टी होणे हे जीवनातील स्वातंत्र्याचे (मुक्ती) तत्वज्ञान गीतेतून स्पष्ट झाले.स्वातंत्र्य या विकास रहस्याच्या बिंदुपासून विकासचक्र प्रवर्तीत केले तर भगवदगीतेतील मोक्षाकांक्षी या शब्दाचे प्रयोजन स्पष्ट होते. मोक्षाकांक्षी दृष्टीमुळे ईश्वराबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो .जग ईश्वर संचालित आहे व या आश्चर्यकारक जगात ईश्वराचा प्रतिनिधी या नात्याने स्वतःच्या जीवनाचे कार्याचे प्रयोजन जाणतो.स्वतःतील चांगलेपणाची शक्ती अनुभवतो यामुळे आत्मविश्वास येतो स्वतःची उपयुक्तता जाणतो यामुळे मी काय करू शकतो?हा विचार दिव्य प्रेरणा (आत्मविश्वास असलेली सकारात्मक प्रेरणा )देतो व जीवनमार्ग पक्का करतो. यामुळे स्वतःला ओळखा या रहस्याचा उलगडा होतो.प्रत्यक्षात साकार होतात त्या दिव्य प्रेरणा ठरतात.यामुळे स्वतःतील दिव्यत्वाची ओळख होते. याप्रमाणे स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलते व नकारात्मक विचार बदलून सकारात्मक होतात.हेच परिवर्तन आध्यात्मिक क्रांती असते.

## १) जीवनाचे विकासचक्र प्रवर्तन : (Walk with GOD )

.**विकासचक्र :** जीवनात **ईश्वरज्ञानाचा आश्रय** होण्यासाठी अध्यात्म ज्ञानाचा वापर करणे वा न करणे, हा मनुष्याचा अधिकार आहे. म्हणूनच स्वातंत्र्याचे संदर्भात बंधन व मोक्ष याद्वारे भेद स्पष्ट करून स्वतःला स्वतंत्र करण्याचे दायित्व स्वतःलाच स्वीकारावे लागते हे सत्य स्पष्ट होते. अहंकाराचा आश्रय प्रकृति असते.यामुळे अज्ञान असते.बुद्धीला अस्थीर करते.ईश्वरज्ञानाचा आश्रय बुद्धीमधील अज्ञानरूपी अंधार दुर करून जीवनमार्ग प्रकाशीत करते. ईश्वरज्ञानामुळे बुद्धियोग मिळतो व बुद्धियोगामुळे विकासचक्र प्रवर्तीत होते.विकासचक्र प्रवर्तनाचा हेतू (अ)दृष्टीबदल होण्यासाठी बुद्धियोग (Connection with God) व (ब) विकास (WalK with God) असतो.याद्वारे जीवनविकासचक्र प्रवर्तीत होते.विकासचक्रातील सुख,ज्ञान व विकास याच्या संकल्पना स्पष्ट होतात.विकासाची दिशा मिळते.जीवनमार्ग प्रकाशीत होतो.स्वतःचा मार्ग विश्वासाने चालतो.

**अ) केवळ एका संदेशाचे महत्व** : मनुष्यातील एखादा चांगला गुण त्याला शिखरावर पोहोचवू शकतो,तर एखादा अवगुण विकासातील अडथळा ठरतो.व्यक्तीमत्व सकारात्मक होण्यासाठी स्वतःमध्ये परिवर्तन स्वतःला करावे लागते.स्वतःच स्वतःच्या अज्ञानाचे निदान केले तर उपाय गवसतो.ज्ञान–अज्ञान याच विषयाला गीतेत प्राथमिकता आहे.ज्ञानाने दृष्टी मिळते.वाहन चालकाला वाहन चालविण्याचे ज्ञान नसेल तर तो अज्ञान ठरतो. गणिताचे ज्ञान नाही म्हणून तो अज्ञान ठरत नाही. स्वतःचा जीवनमार्ग प्रकृतिचे संचलन असते.योगक्षेमासाठी कार्यरत असणे ही प्रकृती आहे,तर कार्यातून योगसाधना होणे व यासाठी स्वतःचा मार्ग जाणून कार्यरत असणे हे ज्ञान ठरते. सुखाच्या संदर्भात जीवनाची प्राकृतिक किंवा व्यावहारिक पातळी व

ज्ञानी पातळी अशा दोन पातळी असतात.जीवन संचालनाची ज्ञानी अवस्था या आधारावरच जीवन मार्गातील अज्ञानाचे निदान होते.अंगुलीमालला अस्थिर बुद्धी,वाल्याला बंधन या एकाच बिंदुवर अज्ञानाचे निदान झाले.

**गोष्ट–** *एक चोर साधूमहाराजाकडे जातो व म्हणतो महाराज , चोरी करणे हा माझा व्यवसाय बनलेला आहे..मला उद्धारासाठी एकाच संदेशातून उपाय सांगा . महाराज म्हणतात नेहमी खरे बोल.एक राजा वेष बदलवून रात्री आपल्या राज्यात फीरत असतो. चोर त्याच राज्यात चोरी करायला येतो.चोराला वाटते हाही चोरच असावा. राजाही त्याला चोर म्हणूनच आपली ओळख देतो. राजा म्हणतो,आपण मिळून चोरी करू या.मी तुला रस्ता दाखवतो.चोर आंत शिरतो व दोन हिरे आणतो. राजाला सांगतो, तेथे तीन हिरे होते,पण वाटणी करता येणार नाही म्हणून मी दोनच आणले.दोघेही निघून जातात.दूसऱ्या दिवशी चोरीची बातमी घेऊन खजीना रक्षक राजाकडे येतो. चोर पकडल्या जातो. चोर म्हणतो मी दोन हिरे चोरले.रक्षक म्हणतो तीन हिरे चोरले. राजा रक्षकाला काढून टाकतो व चोराला रक्षक नेमतो.एकच संदेश चोराचे जीवन बदलवते.कारण या संदेशावर चोराची निष्ठा असते.*

**अपि चेत्सु दुराचारो भजति माम अन्यभाक्**
**साधुएव स मन्तव्य: सम्यग् व्यवसितो हि स:** (गीता ९–३०)

अर्थात दुराचारी असला तरी त्यालाही आध्यात्मिक क्रांतीद्वारे परिवर्तन करण्याचा अधिकार आहे. परिस लोखंडाचे सोने करतो अशी आख्यायिका आहे.तसेच आध्यात्मिक क्रांतीमुळे मनुष्यजीवनाचे सोने होते.ज्याचा अंश हृदयात वास करीत आहे,त्याच ईश्वराला जाणून(कार्याद्वारे) अनन्य(समर्पित)भावाने भजतो ,तो जीवनाचे सोने करतो.चांगल्याला तर दुर्बलता शोभतच नाही.सोन्याला पितळ समजणे अज्ञान ठरते.

जो चांगला आहे तो स्वतःचा जीवनमार्ग विकासचक्रात परिवर्तित करतो.ही जीवनाची ज्ञानी भूमिका असते.ही भूमिका जीवनाचे आव्हान स्वीकारण्यास मनुष्याला समर्थ करते.हाच जीवनाचा आदर ठरतो.हीच आध्यात्मिक क्रांती आहे.म्हणून आध्यात्मिक क्रांती स्वतःसाठी परिसप्रक्रिया ठरते.हाच आध्यात्मिक क्रांतीचा जगाला संदेश आहे. आध्यात्मिक क्रांतीमुळे विकासचक्र प्रवर्तीत होते. विकासचक्र प्रवर्तनाचा वापर आध्यत्मिक व्यवस्थापनात करण्यासाठी याच तंत्राचा उपयोग होतो.

### ब)अज्ञान/ चुकीची संवय जाणणे :

जीवनाचे व्यवस्थापनात धर्मातील केवळ एका सृतिचा वापर केला तर संपूर्ण जीवनावर त्याचा परिणाम होतो हेच सत्य जीवनाचे विकासचक्र प्रवर्तनाचा पाया आहे.व्यक्तीला परंपरेने संस्कार मिळतात.वर्तमानात

जगतांना त्याच्या स्वतःच्या संकल्पना बनत असतात.परंतु स्वतःच्या संकल्पना चुकीच्या असेल तर स्वतःलाच संभ्रम असतो.जी प्रत्यक्षात कृती घडते तेच आपले सत्य असते.

जे प्रत्यक्षात घडत असते ते प्राकृतिक प्रवर्तन (Survival)असते. प्रत्यक्षात जगत असतांना अनेक सकारात्मक व नकारात्मक विचार ऐकत असतो. त्यात विरोधाभासही असतो. **दया धरम का मूल है** ऐकतो, तसेच चांगलेपणा चालत नाही ,ती दुर्बलता ठरते. हेही ऐकतो .या विरोधाभासी विचारामुळे संभ्रम होतो. या स्थितीत जो विचारबिंदू स्वतःला व्यावहारिक वाटतो त्याचा आपण स्वीकार करतो. या एकाच बिंदुने संपूर्ण जगण्यावर परिणाम होत असतो. तो विचारबिंदू नकारात्मक असला तर व्यक्तीमत्वही नकारात्मक प्रवृत्तीचे घडते.

**प्रज्ञावादी भूमिका** :चांगले म्हणावे या सृतिचा वापर केला तर इतरांच्याच भाष्याचा संदर्भ देत असतो.व व्यवहारात अपयश आले वा संभ्रम झाला तर सर्व दोषाचे खापर चांगलेपणावर फोडल्या जाते.यामुळेच प्रज्ञावादी प्रवृत्ती (Advocacy Attitude) बनते. प्रज्ञावादी संवय प्रकृती असते. प्रत्यक्षात जीवन व्यतीत होत राहते. मनुष्य स्वभावनियत जगत असतो ही प्राकृतिक किंवा व्यावहारिक पातळी असते प्राकृतिक पातळीवर मनुष्य कार्यरत होतो. परंतु प्राप्तीसुख अभावामुळे दुःखी होतो.तेव्हा तुलना करून किंवा समर्थन करून व्यक्त केलेल्या विचारात रमण्याची संवय जडते.व्यर्थ व नकारात्मक विचारात रमण्याची संवय हाच अडथळा असतो.प्रज्ञावादी संवय स्वभाव बनतो.स्वभाव प्रकृती बनते.मनुष्य दुःखी होतो तेव्हा प्रज्ञावादी होतो.पण प्रज्ञावादी संवयीनेच स्वतःला बांधून घेतो. ज्ञानी समजतो पण बंधन सुटत नाही.बंधन सुटण्यासाठी ज्ञान हवे असते..यामुळे ज्ञान या संदर्भात प्रज्ञावादी ही एकच संवय मनुष्याची चुकीची संवय ठरते.चुकीची संवय बदलविणे यासाठी आध्यात्मिक क्रांतीचे प्रयोजन आहे.

**आध्यात्मिक क्रांती** : मनुष्यच कार्याद्वारे आपल्या जीवनात चमत्कार घडवीत असतो.स्वतःच्या विकास दृष्टीनुसार जीवन सुरू असते. जुन्या प्रवृत्ती नुसार जीवनाची भूमिका असणे ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे व जग जणू नव्या संकल्पने साठी प्रयोगशाळा आहे यामुळे नव्या संकल्पनेसाठी बघ्याची भूमिका घेणे प्रज्ञावादी भूमिका असते. विकासाच्या मुख्य प्रवाहात स्वतःला आणणे हे स्वतःचेच दायित्व ठरते.प्रज्ञावादी भूमिका बदलून बुद्धियोगी भूमिका करणे हा आध्यात्मिक क्रांतीचा हेतू असतो.अलीकडे आनंदी जीवन,बुद्धीचा वापर होण्यासाठी वैज्ञानिक दृष्टी अशा एकाच बिंदुला लक्ष करून कार्यशाळा होत असतात.जीवनाचे विकासात सर्वात महत्वाचा बिंदु हाच कार्यशाळेचा विषय बनतो.श्रीकृष्णाने सुखासाठी प्रज्ञावादी प्रवृत्ती(कथीत ज्ञानी) हा जीवनातील एकच बिंदु हेरून आध्यात्मिक क्रांती घडवून आणण्यास **बुद्धियोग (**Connect with God**)** हा संदेश दिला.विकासचक्रातील **सुखाचा विचार** या बिंदुपासून विकासचक्र प्रवर्तीत होते.

**ज्ञानसंच्छिन्न संशयम्.** (गीता ४–४१ )

वर्तमानात जीवनाला ईश्वरज्ञानाशी जोडणे (बुध्दियोग)हीच आध्यात्मिक क्रांती आहे..ईश्वरज्ञान म्हणजेच विश्वहितासाठी ईश्वराची भूमिका (Wheel of God )जाणणे ,हा रमण्याचा

(सुखाचा),जाणण्याचा(ज्ञानाचा) विषय आहे,वादाचा विषय नाही.अध्यात्मज्ञानाचा उपयोग करून स्वतःची दुबळी, नकारात्मक भूमिका सक्षम, सकारात्मक भूमिकेत परिवर्तीत होण्यासाठी योग्य ज्ञानाद्वारे दृष्टी व विचारात परिवर्तन होणे ही प्रक्रिया आध्यात्मिक क्रांती ठरते.ही प्रक्रिया जीवन जगण्याची नकारात्मक वैचारिक दृष्टी बदलवून सकारात्मक दृष्टी देते या प्रक्रीयेत वैयक्तीक मन वैश्वीक मनाशी (शक्तीशी) जोडल्या जाते म्हणून जीवनातील आध्यात्मिक क्रांती ठरते.

**२)जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन:**

***Nothing can stop the man with the right mental attitude from achieving his goal;nothing on earth can help the man with the wrong mental attitude.- Thomas Jefferson***

२.१).**स्वतःचे अस्तित्व(ओळख)** : .स्वतःचे नित्य स्वरूप आत्मा हे मान्य केले तर जीवनमार्गात ईश्वरज्ञानाचा आश्रय होणे हेच अध्यात्मज्ञानाचे रहस्य आहे.अध्यात्मज्ञान म्हणजे स्वतःला जाणणे,स्वतःला सृष्टीच्या रंगमंचावरील नायक जाणणे.प्रत्येक व्यक्ती शाश्वत चैतन्यमय अमृताचा वैश्वीक शक्तीचा अधिकारी आहे.या अर्थाने तो ईश्वराचा प्रतिनिधी ठरतो ही ओळख होणे व जीवनाचे प्रयोजन जाणणे हाच शाश्वत धर्माचा संदेश आहे.मानवी जीवनातून ईश्वराच्या दिव्य चैतन्याचे व प्रभावी सुगंधाचे दर्शन व्यक्त व्हावे हेच अमृतधर्माचे रहस्य अर्जुनाच्या माध्यमातून श्रीकृष्णाने जगाला सांगितले. या ज्ञानामुळेच जीवनमार्गाला आव्हान देणाऱ्या विकारावर मात होऊन जीवनयात्रा गतीमान होते व प्रत्यक्षात ठरविलेले (वचनबद्ध – नियतकार्य) कार्य घडते.

**विज्ञान व व्यवस्थापनाची दृष्टी : स्वतःचे अस्तित्व** या संदर्भात अहंकार प्रज्ञावादाचा आधार असतो,तर शाश्वत आत्मा (ईश्वर) ज्ञानाचा आधार असतो. प्रज्ञावाद (निरर्थक भाष्य) व कार्यशाळा (सार्थक भाष्य ) यातील भेद कळतो. वैज्ञानिक दृष्टी लाभते.वर्तमानात प्रश्नाचे निदान करणे व उद्देश ठरविणे शक्य होते. उद्देश (AIM/GOAL) ठरला तर व्यवस्थापन करणे शक्य होते.

**मा सतां हि संदेह पदेषु वस्तुषु प्रमाणम् अंतःकरण प्रवृत्तीम् ॥**

अर्थात जो सात्विक आहे त्याला संदेह नसतो.अंतःकरणातील प्रेरणा प्रमाण असते म्हणून दिव्यप्रेरणा ठरते. यामुळे स्वतःवर दृढविश्वास असतो. चांगले होणे यातील सत जीवनमूल्य ठरते.आध्यात्मिक क्रांती जीवनाचे विकासचक्र प्रवर्तित करते.बुद्धियोगामुळे स्वतंत्र मार्गाची दृष्टी मिळते.निष्काम कार्याचे रहस्य कळते.सकारात्मक मानसिकता व स्वतःचा स्वतंत्र मार्ग बनविणे या ज्ञानामुळे जीवनमार्गाचे व्यवस्थापन करणे शक्य होते .समाजात स्वातंत्र्य संस्कृती (स्वतःच्या मार्गाचे ज्ञान) वृद्धीगत होण्यासाठी आध्यात्मिक क्रांती उपयुक्त ठरते.

## २.२) विश्व(शाश्वत) धर्म– विकासचक्राचा आधार

जगातील प्रत्येक व्यक्ती स्वतःचा मार्ग चालत असतो.कार्यरत होण्यामागे मनुष्याचे स्वतःचे सुखच कारण असते. प्रत्यक्ष कार्याद्वारेच विकास होतो.कार्यामुळेच इच्छित सुखप्राप्ती होते.जगप्रसिध्द योध्दा सिकंदराला प्राप्ती सुखासाठी कार्य या सुखाचे ज्ञान होते. सिकंदराला कार्यक्षमतेमुळे जग जिंकता आले.परंतु जीवनाच्या उत्तरार्धात सुखासाठी पुढे काय करायचे? हा प्रश्न त्याला पडला.ज्या सुखासाठी आपण आयुष्यभर लढा दिला,ते सुख आपल्याबरोबर जाणार नाही,असे सिकंदराला ज्ञान झाले.म्हणून मृत्युनंतर माझे हात शवपेटीच्या बाहेर असावेत ही इच्छा प्रकट केली.यातून सिकंदर पराक्रमी असूनही खाली हात गेला .त्याला सुखाचे ज्ञान मिळाले नाही,हा संदेश जगाने स्वीकारला.याच सुखाचे अर्जुनालाही अज्ञान होते तो दुःखी होतो. सुख म्हणजे दुःखाचा अंत, दुःखान्त म्हणजेच सुखाचे रहस्य ठरते.स्वतःची अज्ञान (नकारात्मक) भूमिका ज्ञानी भूमिकेत (सकारात्मक) परिवर्तित करण्यासाठी श्रीकृष्णाने विश्व धर्माची गरज स्पष्ट केली.विश्वास ,स्थीर बुद्धी,व स्वातंत्र्य हे सुखाचे रहस्य जाणणाराच सुखी मार्गाची निवड करू शकतो.हाच भगवतगीतेचा संदेश आहे.विश्व धर्मात कार्य,सुख याचा संबंध ईश्वरज्ञानाशी जोडलेला आहे.

**ओम तत सत्** (गीता १७–२३)विश्वहितासाठी ईश्वरज्ञान अर्थात सृष्टीतील विश्वविकासाचा प्रवाह काळ ठरविला तर वर्तमान भूतकाळापेक्षा चांगला व भविष्यकाळ वर्तमानापेक्षा चांगला हे सत्य अध्यात्मज्ञानाने उलगडते.याच काळाचे दर्शन श्रीकृष्णाने अर्जुनाला घडवले.यासाठी अर्जुनाला दिव्य दृष्टी दिली तर जगाला ज्ञानाची दृष्टी दिली. विश्व धर्म विकासचक्राचा आधार असतो.तर जीवनविकास या संदर्भात वापरलेले ज्ञान अध्यात्म ज्ञान असते.जीवनमार्गाचे व्यवस्थापन जीवनाचे विकासचक्र असते.या व्यवस्थापनात सुख कारण असते, तर सृष्टीचे व्यवस्थापनात ईश्वर (सृष्टीचे प्रवर्तनचक्र–Wheel of GOD)कारण असते.

### विश्व धर्मातील शाश्वत जीवनमूल्यांचे महत्व

### (*Importance of Goodness & Values*)

जशी पेरणी केली तसे उगवत असते.युवापीढीत आत्मविश्वास वृद्धीगत होणे व समाजात स्वातंत्र्याची संस्कृती वृद्धीगत करणे हेच गुणात्मक शिक्षणाचे (संस्कार) उद्दीष्ट असावे . मानसिक स्वातंत्र्य जीवंतपणाचे लक्षण असते. व्यक्तिआपल्या बुद्धिनुसार आपले जीवनध्येय निश्चित करतो,ध्येयसिद्धीसाठी प्रयत्नशील असतो तोच प्रत्यक्षात स्वतंत्र असतो.परिस्थितिचा गुलाम नसतो.निर्णयअधिकारासाठी स्वावलंबन .निश्चय पक्का होण्यासाठी वचन, निर्णयक्षमता वृद्धीगत करणारा कर्मयोग व.समुहातील बंधन (Tie)सोडविण्यासाठी स्वधर्म हे कार्य कौशल्य या उपयुक्त जीवनमूल्यांचा गुणात्मक शिक्षणात समावेश असावा.

### अ) चांगली (सत)व्यक्ती ज्ञानी होण्यास पात्र :

उच्चतम अवस्थेतही प्रकृती वा धर्मश्रृति जेंव्हा मनुष्याला दुबळे करते तेंव्हा व्यक्ती सामान्य (प्राकृतिक) पातळीवर घसरतो. या अवस्थेत प्राप्ती इच्छा (वैभव, किर्ती, स्वर्ग इ.) जीवनमूल्यांना आव्हान देत असतात. यामुळेच कार्याची निष्ठा डळमळते. बंधन मुक्तीची अमृत धर्म किल्ली आहे.

**दैवी संपद्वीमोक्षाय निबंधाय आसुरी मता**

**मा शुचाः संपदम दैवीम् अभिजातोअसि पांड्व.**(गीता १६–५.) अर्थात चांगली व्यक्ती (मोक्षासाठी)स्वातंत्र्यासाठी जन्माला आलेली आहे.स्वतःचा जीवनमार्ग स्वतंत्र करण्यासाठी मोक्षाकांक्षी या शब्दाचे प्रयोजन गीतेत केले आहे.मार्ग चालतांना प्राकृतिक व ज्ञानी या दोन पातळीच परिवर्तनाचा आधार ठरतात.याचसाठी शाश्वत अमृत धर्माचे प्रयोजन आहे आध्यात्मिक क्रांतीमुळेच बुद्धियोग लाभतो.बुद्धियोगामुळे **असतो मा सत गमय** असा जीवनमार्ग बनवतो.

**ब)स्वातंत्र्य** : जीवनाच्या ज्ञानी भूमिकेत बंधनमुक्तीसाठी (Tiebreaker) योग्य–अयोग्य कार्य याचा आधार (लक्ष्य) अमृत(शाश्वत)ज्ञान अर्थात स्वातंत्र्याचे ज्ञान असते.मोक्ष ही संपूर्ण स्वातंत्र्याची संकल्पना आहे.स्वधर्म व कर्मयोग द्वंद्वमुक्त होण्यासाठी जीवनमूल्ये ठरतात. याद्वारा स्वतःच आपल्या मार्गावर स्वतंत्र मार्गाचे शिक्कामोर्तब करतो.व्यवहार मार्गात कार्याची प्रेरणा इच्छा, प्रश्नाची सोडवणूक, दिव्यप्रेरणा कोणतीही असली तरी कार्याचा उद्देश मुक्ती म्हणजे स्वातंत्र्य ठरते.

**क)विजयी मानसिकता:** बौद्धिक ज्ञानाचा प्रत्यक्षात वापर होण्यासाठी ज्ञानी व्यक्तिमत्त्वाची धारणा ही गरज असते.ही जीवनाची ज्ञानी पातळी ठरते. या पातळीवर स्वतःला लाभलेले कार्य दैव , कार्याची प्रेरणा व फलीत ईश्वरकार्य ही दृष्टी लाभल्यामुळे विजयी मानसिकता धारण करतो.

**तस्मात त्वं उत्तिष्ठ यशो लभस्व**(गीता ११–३३) **(War is won in the mind first)**) याप्रमाणे द्वंद्वावर विजय मिळविण्यासाठी ज्ञानाने संशय मिटवतो दृढनिश्चयी होतो त्याची भूमिका विजयी मानसिकता धारण केलेल्या कुरूक्षेत्रावरील योध्याची असते. याच भूमिकेत सिध्दी–असिध्दी यांत समत्व साधुन योगासाठी कार्यरत होतो व योग संसिध्द होतो. हाच द्वंद्वावर विजय असतो.

### २.३) आध्यात्मिक व्यवस्थापन :

वर्तमानात सकारात्मक मानसिकता सुखी जीवनाचे रहस्य ठरते.प्रत्येक क्षणाला कार्य घडते.सुखासाठी कार्यरत असतो. प्राप्तीसुख प्रेरणा (state of want) ;सहजकार्य(state of art) व गुण( values)याद्वारा प्रकृतिकार्य चालु असते.जीवनमार्गात निर्णय ठरविताना परिणामाचे भय द्वंद्व निर्माण करते. द्वंद्वामुळेच बुद्धीभ्रम होतो.व अहंकारामुळे प्रज्ञावादी भूमिका घेतो.द्वंद्ववश अवस्था प्रकृतीवश ठरते.

विश्व/अमृत)धर्मात सुख,कार्य,निर्णय,जीवनमूल्ये (गुण) याचा संबंध ईश्वरज्ञानाशी जोडलेला आहे.अव्यक्त(शाश्वत)ईश्वराची ज्ञान साधना होण्यासाठी कार्यनिष्ठा असणे हा दृष्टीबदल आध्यात्मिक क्रांतीमुळे होतो.

**आध्यात्मिक क्रांती:** जीवनाच्या ज्ञानी पातळीवर प्रवास स्वतःचा असतो. प्राकृतिक पातळीवर प्रकृतिचे कार्य सुरू असते. हेच कार्य साधना होण्यासाठी बुद्धीला **शाश्वतधर्माने युक्त करणे हीच आध्यात्मिक क्रांती आहे.**.मनुष्याचे ध्येयच ज्ञानी पातळीवर जीवनाचा प्रवास करणे व ज्ञानी होणे असावे.

आपली जीवनयात्रा ज्या पातळीवर संचालीत आहे ती तशीच चालू ठेवणे अथवा विश्वाच्या अमृत धर्माने बुद्धीला संस्कारीत करून गतीमान करणे याची निवड करण्याचा अधिकार मनुष्यालाच प्राप्त आहे.प्राकृतिक पातळीवर मार्गात होणारा संभम्र, जाणवणारे अडथळे व यामुळे आलेली दुर्बलता ज्ञानी पातळीवरील धारण केलेल्या भूमिकेमुळे दूर(Breaking the barriers) होतात.या अवस्थेत बुध्दी विचलीत न होता आत्मविश्वासाने मार्गक्रमण होते बुध्दीतील संशय संभ्रमाचे कारण ठरते. ईश्वरज्ञानामुळे संशय दूर होऊन विश्वास धारण होतो.कार्याद्वारे योगसाधना होण्यासाठी याच ईश्वर ज्ञानाचा आश्रय करून ईश्वरभक्ती कार्यातील निष्ठेचे (Devotion)कार्य करते व बुद्धीला स्थीरता प्राप्त होते.

कार्याद्वारा आध्यात्मिक साधना ( योग) होण्यासाठी प्रकृतिधर्मकार्य स्वधर्मात व निर्णय कर्मयोगात परिवर्तित करतो.याप्रमाणे जीवन मार्गातील कार्याद्वारे दुःखमुक्ती अर्थात सुखाची साधना करण्यासाठी कार्याचे आध्यात्मिक व्यवस्थापन करणे हाच शाश्वत(विश्व/अमृत)धर्माचा हेतू स्पष्ट होतो. निष्काम कर्माचे हेच रहस्य आहे. या प्रमाणे आध्यात्मिक व्यवस्थापनाद्वारे प्रकृतिकार्याचा मार्गच ज्ञान मार्ग,योग मार्ग अर्थात साधनेचा मार्ग होतो.हाच अमृत प्रवास असतो.

Edit with WPS Office

मान्यवर तज्ञांचा अभिप्राय

१.प्रा.डॉ.संगीता खुरद
नागपुर

प्रत्येक मानवी जीव कर्तृत्व सिद्ध्र करण्यासाठीच या पृथ्वीवर आलेला आहे.मात्र अज्ञानापोटी त्याला या उद्देशाची ओळख झालेली नसते.कधी ही ओळख झाली तरी यातना सहन करुन ध्येयप्राप्ती करुन घेण्याची त्याची तयारी नसते.त्यामुळे मानवी जीव भरकटतो.अशा प्रसंगी मार्गदर्शक,पथदर्शक म्हणुन भगवदगीतेसारखा ग्रंथ धावुन येतो.या ग्रंथातलं तत्त्वज्ञान साध,सरळ आणि सोप आहे.परंतु सामान्य जनापर्यंत हे तत्त्वज्ञान येतायेता ते क्लीष्ट आणि अनाकलनिय होत जाते.त्यामुळे सर्वसामान्य माणसापासुन गीतेचे हे तत्त्वज्ञान दुर राहते.समाजापर्यंत या ग्रंथातील तत्त्वज्ञान जर पोहोचले असते तर इतक्या वर्षात मानवी समाजाचा चेहरामोहरा बदलुन समाज विकासचक्राच्या प्रवासात कितीतरी प्रगतीपथावर दिसला असता,तथापि वर्तमान समाजाचे चित्र विपरीत दिसते.

"गीताई माऊली माझी तिचा मी बाळ नेणता, पडता रडता घेई उचलुनी कडेवरी" असे गीताग्रंथाबद्दल आचार्य विनोबा भावे भावना व्यक्त करतात.याच भावनेचे प्रत्यंतर प्रस्तुत "विकासचक्र" ग्रंथात येते.

मानवी जीवनविकासाच्या चक्रात श्री भगवदगीता हा मातृतुल्य ग्रंथ आजही कसा आणि किती उपयुक्त ठरते हे माननीय लेखकाने अभ्यासपुर्ण आणि विस्तृतपणे आपल्या लिखाणात १.भगवदगीता -परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान २.आध्यात्मिक क्रांती ३.जीवनविकास ४.विकासचक्र या पुस्तकांतुन शब्दबद्ध केले आहे.

प्रा.डॉ.संगीता खुरद
(मराठी विभाग, अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय नागपुर)

*****        *******        ***

२..डॉ. रमेश बी. ठाकरे
नागपुर

हिंदू धर्म म्हणून ओळखल्या जाणार्‍ या वैदिक धर्मात अनेक पुस्तके लिहिल्या गेलेली आहेत. परंतु यापैकी केवळ काही पुस्तके सामान्य लोकांना समजली आहेत. गीता म्हणजे उपनिषद आहे ... परंतु उपनिषदातील आशय फारच कमी लोकांना समजेल.

श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यात कुरुक्षेत्राच्या रणांगणातील संवाद म्हणजे गीता किंवा भगवदगीता; जे जीवनाचे वास्तव सांगते; क्षणिक वास्तव आणि परिपूर्ण वास्तव यांतील भेद सांगते आणि विश्वाचे एक अस्सल वास्तव कळते.

भगवदगीतेवरील महानुभावांनी लिहीलेली पूर्वीची पुस्तके जसे संत ज्ञानेश्वरांनी लिहीलेली प्रसिद्ध "ज्ञानेश्वरी". .. लोकमान्य टिळकांचे "गीता रहस्य" सर्व लोकांना पूर्णपणे समजत नाहीत परंतु "गीताचार्य साहेबराव जवंजाळ" यांनी केलेले अधिक सोपे लेखन सोप्या शब्दात आहे . ही पुस्तके सोप्या शब्दात आणि सहजपणे उपलब्ध आहेत .

शांतता आणि मानवतेच्या देखभालीसाठी बहुतेक सामान्य लोकांना धर्म आवडतो. "गीता ज्ञान आणि अध्यात्मावरील अभ्यास" आपल्याला आपल्यात बदल घडवून आणण्यासाठी एक संधी देते आणि इतरांना चांगल्या प्रकारे समजण्यास मदत करते.

१.भगवदगीता-परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान
२.आध्यात्मिक क्रांती -परिवर्तनाचे व्यवस्थापन
३.जीवनविकास-जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन
४.विकासचक्र-आध्यात्मिक व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान

गीताचार्य साहेबराव जवंजाळ यांनी लिहिलेली ही चार पुस्तके .. गीतेवरील त्यांच्या पुस्तकात स्पष्ट केलेल्या विचारांद्वारे आपल्याला "मुल्याधिष्ठित अध्यात्म" आणि त्याच्या अभ्यासाद्वारे आत्म-अनुभूती मिळते .हा अभ्यास आपल्याला मार्गदर्शन करतो आणि आपल्याला निसर्गाची काळजी आणि लोभ


Edit with WPS Office

आणि स्वार्थापासून मुक्तता यांचे महत्व शिकवितो.

गीता आणि अध्यात्म या त्यांच्या चार पुस्तकांमुळे आम्हाला स्वावलंबि होण्यास मदत मिळेल आणि त्यांचे भगवदगीतेचे ज्ञान आपल्याला "जीवन विकासाबद्दल निश्चित समज देईल . त्यांचे" विकास चक्र "ज्यांना देवाची सेवा करण्यास आवडेल अशा लोकांसाठी कार्यरत राहील.
आध्यात्मिक विषयावरील जवंजाळ ज्ञान शांतिपूर्ण जगामध्ये सुसंगत राहण्यासाठी खूप उपयुक्त ठरेल. मी त्यांच्या लेखनात दिलेल्या विचारांची शिफारस करतो आणि त्यांची प्रशंसा करतो.

डॉ. रमेश बी ठाकरे
(एम. एस.सी., पी. एच .डी. युनिव्हर्सिटी कॅलिफोर्निया डेव्हिस यू.एस.ए.)
माजी सल्लागार जागतिक बँक,( जागतिक बँकेच्या आफ्रिका प्रदेशातील  प्रकल्पासाठी )आणि
उपाध्यक्ष भारत कृषक समाज भारत.

आध्यात्मिक क्रान्ति
-परिवर्तनाचे व्यवस्थापन
(CHANGE MANAGEMENT)
या पुस्तकावरील तज्ञांचे अभिमत




श्री.सुधीर ठाकरे (I.A.S )
माजी अध्यक्ष,महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MESSAGE

This document is a lucid blend of practicing spirituality with mundane human activities that inspires a harmony amongst 3H ; Head, Heart & Hand. It initiated with a message of "Walk the Talk" citing a verse by Sant Tukaram and take readers to educate as to how to tread the path of salvation stepping from acquiring information, converting it to knowledge , applying it for betterment of humanity in varied associations of the individual from family, community, society, nation to world.

It thus covers the processes of how to Inform , Reform, Perform and Transform oneself as preserved in various texts & actually preached and practiced by great minds in the universe .

A rare book to get a glimpse of all these aspects in a nutshell.


I think the book will be useful to all who desire of following these principles.

Wish all the success to the thoughtful book by Mr. Jawanjal.

Sudhir Thakre.(IAS retd.)
Former Chairman, MPSC.


गीता सर्वांनाच वंदनीय आहे. काही लोक अजिबात न वाचता तिला वंदनीय म्हणतात. काही वाचायचा प्रयत्न करतात व सोडून देतात. काही तिचा अर्थ न समजता ती वाचतात, तिचे पठण करतात. काही तिचा अध्यात्मिक अर्थ समजून घेऊन वाचतात. श्रीमद्शंकराचार्यांनी त्यातला ज्ञानयोग जाणला व जाणकारांत पसरवला. संत ज्ञानेश्वरांनी त्यातला भक्तीयोग अंगी बाणवला आणि सामान्यजनांत प्रसार केला. लोकमान्य टिळकांनी त्यातल्या कर्मयोगाचे तत्कालीन महत्त्व जाणले आणि गीतारहस्याद्वारे तो लोकांप्रती पोहोचवला. स्वामी विवेकानंदांनी तिचे वैश्विक महत्त्व जाणून ती आंतरराष्ट्रीय स्तरावर नेली. हे सर्व गेल्या शतकांतील त्या त्या काळांशी सुसंगत होते. श्री. साहेबराव जवंजाळ यांनी २१ व्या शतकातील तरुणांना ही गीता किती मार्गदर्शक आहे याचे सार्थ दर्शन त्यांच्या पुस्तकातून घडवले आहे. एका अर्थी त्यांनी आपल्याआधीच्या या चार महानुभावांचे कार्य पुढे नेले आहे. भगवद्गीता सार्वकालीन आहे, वैश्विक आहे आणि चिरतरूण आहे. ते बदलाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान आहे. Today’s youth has to face the challenge of CHANGE and Bhagavadgeeta is the right Philosophy for MANAGING the CHANGE in right direction. या संदर्भात साहेबरावांनी जगभरातील अनेक महान तत्त्ववेत्त्यांचे व विचारवंताचे विचार संदर्भासाठी नेमके मांडले आहेत. भगवद्गीतेचे अनेक पैलू व त्यांची आजच्या व येणाऱ्या काळाशी सुसंगती त्यांनी मांडली आहे. हे पुस्तक अध्यात्माहून अधिक व्यवस्थापनशास्त्राचे आहे.


हे पुस्तक प्रत्येक तरुणाने वाचावे असा आमचा आग्रह राहील. नुसते वाचू नये तर ते आत्मसात होईतो वाचावे. अभ्यासावे.




**खालील कव्हर्सवर क्लिक करून थोडा वेळ थांबा.**

**ते ते पुस्तक आपोआप उघडेल.**



**चार पुस्तकं वाचली म्हणजे कोणी शहाणा होतो का?**

**हो.**

**होतो.**

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. बऱ्याच प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला स्वतःचे अनुभव व आईवडील यांसोबत पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**म्हणून वाचा**

**कृपया वाचत रहा.**

**म्हणून वाचा. वाचत रहा.**


**www.esahity.com**

**www.esahity.in**

**विनामूल्य वाचक नोंद करण्यासाठी लिहा**

**esahity@gmail.com**